

१८२०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र. नं. ९५२

RFLBK-0001764

# विक्रीस तयार असलेले उपयुक्त ग्रंथ.

१ **श्रीशिवाजीमहाराजांचें** चरित्र—( इंग्रजी ) मोठ्या आकाराचीं व बारीक ...लीं पृष्ठें ६५०, श्रीयुत केळूसकर याच्या मराठी चरित्रावरून ... यांनीं लिहि... कमी केलेली किंमत १

२ **श्रीशिवाजी महाराज**... ...त चरित्र—( मराठी ) श्रीयुत केळूसकर यांनीं लिहिलेलें ... वृत्ति २ री, पृष्ठें ६१४. कमी केलेली किंमत रुपये २

३ **श्रीशिवाजीमहाराजांचें संक्षिप्त चरित्र**—( मराठी ) श्रीयुत केळूसकरकृत, मराठा-ऐक्येच्छु सभेच्या वियमानें तयार केलेलें, उत्तम चित्रांसह, पृष्ठें १६८, किंमत ८ आणे.

४ **नीतिबोधमाला**—सुमनें २, ३ व ४ प्रत्येक सुमनाचीं पृष्ठें २५६. यांत निरनिराळ्या नीतिपर विषयावर सोप्या गोष्टी दिलेल्या आहेत. ( ले. कृ. अ. केळूसकर ) प्रत्येक सुमनाची किंमत १२ आणे.

५ **स्पर्शास्पर्श** अथवा **चारही वर्णांचा परस्परव्यवहार**—शास्त्र, इतिहास, रूढि इत्यादि आधारांसह सोपपत्तिक विवेचन. ( लेखक श्री. दा. सातवळेकर ) कमी केलेली किंमत रुपया १.

६ **गुजराती शिक्षक**—या पुस्तकाच्या आधारें शिक्षकाशिवाय मराठी बराच्या सहा महिन्यांत गुजराती भाषेचें ज्ञान होऊन गुजरातींत लिहितां, वाचतां व बोलतां येतें. किं. १२ आणे.

७ **क्षत्रिय आणि त्यांचें अस्तित्व**—( कै. वासुदेवराव बिंज यानीं लिहिलेलें, आवृत्ति दुसरी) यांत क्षत्रियांची उत्पत्ति व अस्तित्व या संबंधानें सोपपत्तिक विवेचन केलेलें आहे. किंमत २ रुपये.

☞ वरील पुस्तकें खालीं सहीकरणाराकडे व श्रीयुत कृ. अ. केळूसकर, दादर, मुंबई यांजकडे मिळतील बाहेरगावच्या ग्राहकांस टपाल व्ही. पी खर्च आकार पडेल. नॉटपेड पत्र घेण्यांत येणार नाहीं

**दामोदर सावळाराम आणि मंडळी**
इंदुप्रकाश छापखाना, ठाकुरद्वार, मुंबई नं २.

ग्रं. क्र. १०४

२८-३-५८

# चरित्रकाराचे दोन शब्द.

मालोजी राजे व शहाजी राजे भोंसले यांविषयींची जेवढी माहिती बखरींतून व मुसलमानी इतिहासांतून मिळणारी आहे तिच्या ग्राह्याग्राह्यतेबद्दल चिकित्सक पद्धतीनें विचार करितां करितां जीं माझीं ठाम मतें ठरलीं तीं एकत्र जुळवून मीं हें चरित्र नुकतेंच तयार केलें, व भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या अष्टमसंमेलनात वाचिलें. सदर मंडळाच्या त्रैमासिकांत तें छापिलेलेंही आहे असें असतां त्याचेंच आणखी हें निराळें पुस्तक प्रसिद्ध करण्यात हेतु एवढाच कीं, यांतील माहितीचा अधिक फैलावा होऊन सामान्य वाचकवर्गात इतिहासाची आवड उत्पन्न व्हावी.

मिरज, ता. २०।७।२० — वासुदेव वामन खरे.

दा. क्र. १७६८

RILBK-0001764

# या चरित्रांतील सनांची जंत्री.

१५३० बाबाजींचा जन्म.

१५५० मालोजींचा जन्म.

१५५३ विठोजींचा जन्म.

१५७७ मालोजी निजामशाहीची चाकरी धरितो.

१५९४ शहाजीचा जन्म.

१५९६ जिजाऊचा जन्म.

१५९९ मालोजी व जाधवराव यांचा तटा.

१६०० मालोजीस दृष्टांत

१६०१ { निजामशाहीची पुन्हां स्थापना परांडें येथें राजधानी.

१६०३, १६०४, १६०५ } पैकीं कोणत्यातरी वर्षीं जिजाऊ-शहाजीचें लग्न

१६०७ दौलताबाद येथे राजधानी.

१६२० { मालोजीचा मृत्यु, शहाजीस सरदारी मिळते; जाधवराव मोंगलास मिळतो.

१६२६ मलिकंबर याचा मृत्यु.

१६२७ निजामशहा व लोदी यांमध्यें तह.

१६२८ शहाजीची खानदेशावर स्वारी.

१६२९-३० मोंगलांनीं लोदींचे बंड मोडलें.

१६३० (मार्च) शिवाजीचा जन्म.

१६३० (जून) फत्तेखान कैदेंत पडला.

१६३० (आगष्ट) जाधवरावाची कत्तल झाली.

१६३० (सप्टेंबर) शहाजी बंड करितो.

१६३० (आक्टोबर) मुरारपंताची शहाजीवर स्वारी.

१६३१ शहाजी मोंगलांच्या नोकरीस राहतो समर्थांची व शहाजीची नाशिक येथें भेट झाल्याचा संभव

१६३३ शहाजी मोंगलास सोडून विजापुरकरास मिळतो.

१६३३ शहाजी व विजापुरकर याचा दौलताबादेस वेढा व जूनपर्यंत मोंगलाशीं युद्ध

१६३३ मार्च ते जून } दौलताबादेजवळ मोंगलाची शहाजी व विजापुरकर याशीं लढाई सुरु

१६३३ (जून) मोंगल दौलताबाद घेतात.

१६३३ (जुलै) शहाजी मुर्तिजा निजामशहा तिसरा यास गादीवर बसवितो.

१६३३ (सप्टेंबर) मुरारपंताची तुळा

१६३४ (मे) मोंगलाचा परांड्यास वेढा बसला होता तो उठला.

१६३४ शहाजीची मोंगलाई मुलखावर स्वारी (सबंद वर्षभर.)

१६३५ " " " "

१६३६ (फे.) शहाजहान दक्षिणेंत येतो.

१६३६ (मे) मोंगल जुन्नर घेतात व त्याचा विजापुरकरांशीं तह ठरतो व दोघेहि शहाजीच्या पाठीस लागतात.

१६३६ जून ते आक्टो } शहाजीचा पाठलाग पुढें चालू. आक्टोबरांत शहाजी मोंगलाशीं माहुली येथें तह करतो.

१६३७ शहाजी विजापुरकराच्या चाकरीस राहतो.

१६३८ तुकाबाई-शहाजीचें लग्न. जिजाऊ व शिवाजी यांची विजापूर अगर बंगळूर मुक्कामीं भेट.

१६३९ खेळोजीचा मृत्यु

१६४०-४१ जिजाऊ व शिवाजी यांची शहाजीस भेट. शिवाजीच्या राज्यस्थापनेस प्रारंभ

१७६४

# मालोजी व शहाजी.

( लेखक - रा वासुदेवशास्त्री खरे. )

प्रस्तुत निबंधांत मालोजी व शहाजी याच्या चरित्रोविषयीं चर्चात्मक विवेचन करून या चरित्रांचा विशेषेंकरून शहाजीच्या चरित्राचा शिवाजीच्या अभ्युदयाशीं किती निकट सबध आहे हें दाखवावयाचें आहे मालोजीच्या चरित्रास बखरींखेरीज दुसरा आधार नाहीं हें उघडच आहे. सुदैवानें शहाजीचें चरित्र लिहिणारास यापेक्षां थोडीं अधिक साधनें उपलब्ध झालीं आहेत. तीं साधनें म्हणजे प्रो. यदुनाथ सरकार यानी केलेले मुसलमानी इतिहासाचे तर्जुमे व त्यांवर लिहिलेले चर्चात्मक लेख व रा. राजवाडे यांनी प्रसिद्ध केलेले खड वगैरे हीं होत या सर्व साधनाचा उपयोग मी येथें करीत आहें.

मालोजीच्या चरित्राचा विचार करण्यापूर्वी त्याचा बाप बाबाजी भोंसले याविषयीं आधीं चार शब्द लिहिले पाहिजेत. बखरींतून भोंसल्यांचा मूळ पुरुष बाबाजी भोंसले वेरूळकर हा धरतात बाबाजीच्या बापाचें नांव संभाजी. ( चिटणीस व पृ. १२ ) इतर प्राचीन मराठे कुळांप्रमाणें भोंसले हेही उत्तरेकडून आलेले मूळचे रजपूत होत. खुद्द शहाजीनेंच एके ठिकाणीं ' आपण रजपूत लोक ' असें स्वतःविषयीं म्हटलें आहे त्यावरून ही गोष्ट निर्विवाद आहे ( श्री साप्रदायिक विविध विषय पृ. २११ ) भोंसले हे राजकुलोत्पन्न शिसोदे घराण्यातले म्हणवितात तेंही बहुतांशीं खरें असण्याचा सभव आहे. भोंसल्यांची सापत्तिक स्थिती बेताबाताचीच होती तरी त्यांचें कुलीनत्व सर्वमान्य होतें. ते स्वतःस राजे म्हणवीत असत. उदाहरणार्थ बाबाजीनेंच स्वतःस राजे हें उपपद लाविलें आहे. ( राजवाडे खंड १५ ले. ३६७ ) निजामशाही दरबाराकडून मालोजीस राजे हें पद स. १६०३ त मिळालें. त्यापूर्वी ६ वर्षांचा हा उल्लेख आहे. बाबाजीचा जन्म १५३० त झाला. त्याच्या बापाचें नांव मालोजी असें शेडगावकर बखर पृ. २ वर म्हटलें आहे. असो. बाबाजीस स. १५५० त मालोजी व स. १५५३ त विठोजी असे पुत्र झाले असें शिवदिग्विजयावरून सिद्ध होतें. चिटणीसबखरींत मालोजी व विठोजी यांचे जन्मशक अनुक्रमें श. १४७२ व ७५ म्हणजे इ. स. १५५० व ५३ हेच दिले आहेत शेडगांवकर बखरींत मात्र मालोजीचा जन्म श १४७४ ( इ. स. १५५२ ) त वेरूळ येथें झाल्याचें लिहिलें आहे. ( पृ २ ) बाबाजीचा मृत्युशक कोठें दिलेला नाहीं, पण तो १५९७ पर्यंत म्हणजे वयास ६७ वें वर्ष लागेपर्यंत जिवंत होता असें राजवाडे खंड १५ ले. ३६७ वरून म्हणतां येतें

स. १५७७ त मालोजी हा लुखजी जाधवराव याच्या वशिल्यानें आपला भाऊ विठोजी यासह निजामशाही सरकारच्या सैन्यांत चाकरी पतकरता झाला. कोणी म्हणतात कीं, तो खुद्द जाधवराव याच्याच पदरीं चाकरीस होता. सरकारांतून त्याच्या चिमुकल्या पथकाची चाकरी जाधवराव हे मराठ्यांतले सर्वांत मुख्य पथके असल्यामुळें त्यांच्या दिमतीस दिली गेली असावी हें अधिक संभवतें. वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी मालोजीनें चाकरी धरली म्हणावयाचें तें डफनें २५ व्या वर्षी धरली म्हटलें ही रा. राजवाडे यांनीं चूक काढिली आहे, पण शेडगावकर बखरींतला मालोजीचा जन्मशक १४७४ ( स. १५५२ ) खरा धरला तर डफचें म्हणणेंही चुकलें नाही. मालोजी हा लुखजी जाधवरावाच्या पदरीं दरमहा पांच होनांची तैनात घेऊन चाकरीस राहिला होता असें कोठेंकोठें लिहिलें आहे तें खरें असण्याचा संभव फार कमी आहे कारण कीं, मालोजी जर त्या वेळीं इतक्या दैन्यावस्थेला पोंचलेला असता तर फलटणकर वंगोजी नाईक निंबाळकरानीं त्याला आपली दीपाबाई नांवाची बहीण दिलीच नसती.

वर सांगितलेल्या लुकजी जाधवरावाचें सबंध नांव लुकजी कुकजी यादव असें राजवाडे खंड १५ ले. २ पृ. १३ वर दिलें आहे. मालोजीनें चाकरी धरली ती लुकजीच्या अमदानींत कीं त्याचा बाप कुकजी याच्या अमदानींत अशी येथें शंका उत्पन्न होते. शंकेचें कारण कालगणनेचा थोडा हिशेब केला असतां समजून येईल. लुकजी हा बलाढ्य, नामांकित, वजनदार सरदार म्हणून मालोजीनें त्याच्या आश्रयानें निजामशाहींत चाकरी धरली. अर्थात् इतक्या योग्यतेचा हा लुकजी त्या वेळीं म्हणजे स. १५७७ त कमीतकमी तीस वर्षांचा तरी धरला पाहिजे. पण तसें करू जावें तर स. १६२७ त शिवजन्मापूर्वी त्यानें शहाजीचा ईर्षेनें व त्वेषानें पाठलाग केला तेव्हां तो ८० वर्षांचा होता असें ठरूं लागतें ! अथवा जेधे शकावलींतला शिवजन्माचा शक १५५१ खरा धरला तर लुकजी त्या वेळीं ८२ वर्षांचा ठरूं पहातो. त्याच वर्षी म्हणजे स. १६२९ त मूर्तिजा निजामशहानें त्यास भेटीस बोलावून मारेकरी घालून मारिलें. ( डफ पृ. ४५ ) मारेकऱ्याकडून तरवारीचे वार होत होते आणि लुकजीजवळ नुसती कट्यार होती तरीही तो चित्त्याप्रमाणें धैर्यानें व चपलाईनें लढत मारता मारतां मरून गेला असें त्याचें वर्णन केलेलें आहे. ८२।८३ वर्षांच्या वयात इतका त्वेष, इतकें सामर्थ्य, आणि इतकें तेज माणसाच्या अंगीं असूं शकेल कीं नाहीं एवढीच काय ती शंका ! बाकी हल्लीच्या पिढीचे आम्ही लोक दुर्बल, तेजोहीन व अकाल वार्धक्यानें जर्जर होणारे असे निपजलों म्हणून आम्हाला ही शंका येते असेंही कोणी वाटेल तर म्हणावें. कारण कीं, ७० व ८० च्या पुढें स्वाऱ्याशिकाऱ्या करितां करितां देहावसान पावलेलीं माणसें आपल्या इतिहासांत हवीं तितकीं सांपडतील ! मरणसमयीं मलिकंबर ८०, औरंगजेब ९५, निजाम उलमुल्क १०४ वर्षांचे होते हें प्रसिद्धच आहे ! मल्हारजी होळकर, धनाजी जाधवराव, मालोजी घोरपडे, हैदरअली, यांचीं ८० च्या

पुढें व नारो शंकर, विठ्ठलराव विंचूरकर, शहाजी महाराज यांची मजल मरणसमयीं सत्तरपर्यंत गेली होती. हे सर्व लोक मोहिमेवर असतां मेलेले आहेत. असो. लुकजीच्या वयावरून उत्पन्न झालेली ही शंका महत्त्वाची आहे असें नाहीं, तथापि ती प्राप्त झाल्यामुळें तिचा जाता जाता उल्लेख केला. जाधवरावाकडे मालोजीनें चाकरी धरिली त्याचा शक शि. दि. कारानें १५२१ ( स. १६९९ ) दिला आहे ! ( पृ. ३८ ). तो शक त्याज्य होय. कारण तो शक खरा धरावा तर ४९ वर्षांचा होईपर्यंत मालोजी माशा मारीत घरीं बसून राहिला होता, असें सिद्ध होऊं लागेल.

स १५७७ पासून १५९९ पर्यंत मालोजीच्या हातून कांहीं विशेष कामगिरी झाल्याचें कोणास ठाऊक नाहीं या बेवीस वर्षांचा त्याचा आयुष्यक्रम एखाद्या सामान्य गरीब पथक्याप्रमाणेंच चालला होता. त्यास मूल होत नव्हतें तें व्हावें म्हणून अहमदनगरचा पीर शहाशरीफ यास त्यानें नवस केला होता. तो पीर नवसास पावून मालोजीस दोन पुत्र झाले त्यांचीं नांवें त्यानें शहाजी व शरीफजी अशीं ठेविलीं होतीं शहाजीचा जन्म वेरूळ येथें श. १५१६ ( स. १५९४ ) मध्यें झाला ( शि. दि. पृ. ३७ । ३८ ). मागून तीन वर्षांनीं शरीफजी झाला. जाधवरावास जिजाऊ ही कन्या श. १५१८ मध्यें झाली. ( चिटणीस बखर पृ. १७ ) बखरवाल्यानी शरीफजीच्या नांवास सरूपजी व स्वरूपजी असें संस्कृत रूप दिलें आहे शहाजीच्या नावावर मात्र त्याचा कांहीं इलाज चालला नाहीं. मालोजीचा भाऊ विठोजी यास आठ पुत्र झाले त्यांचीं नावें शिवदिग्विजय पृ. ३६ वर संभाजी, खेळोजी, परसोजी, नागोजी, मयाजी, त्रिंबकजी, मकाजी आणि मालोजी अशी दिलीं आहेत. राजवाडे खंड १५ ले. ३९५ मध्यें विठोजीच्या मुलांचें वांटणीपत्र दिलें आहे त्यांत सातच नांवें असून त्यात वरील नांवाहून मंबाजी हें एक निराळें नांव आहे. सदहू लेखाकापैकीं ककाजी हें मकाजीबद्दल चुकीचें वाचन असू शकेल. पण त्या प्रकरणांतल्या निरनिराळ्या लेखांकांतून लक्ष्मोजी राजे, सर्जाराव राजे, व कृष्णाजी राजे आले आहेत हे कोण ? आपणास आजपर्यंत अज्ञात असे हे कोणी बाबाजीचे बंधु अथवा त्या बंधूचे पुत्रपौत्रादि असावेत असा तर्क करण्यास येथें अवसर आहे

स. १५९९ त शहाजी व जिजाऊ यांचें लग्न होण्याच्या बाबतींत जाधवराव व मालोजी यांत मोठा तंटा होऊन मालोजी नोकरी सोडून वेरुळास घरीं जाऊन बसला तें सर्वप्रसिद्धच आहे. तेथें गेल्यावर दोनतीन वर्षांत केव्हां तरी त्यास देवीचा दृष्टांत होऊन भूमिगत द्रव्य सांपडलें असें रायगडबखरींत लिहिले आहे तें सयुक्तिक दिसतें व ग्रांटडफनेंही तें मान्य केलें आहे चिटणीसबखरींत दृष्टांताचा शक १५२५ ( स. १६०३ ) दिला आहे तो निदान एक वर्षानें तरी पुढें ढकलला गेला आहे तर शेडगावकर बखरींत पृ. ७ वर हा शक १५१६ ( स १५९४ ) दिला आहे तो

७१८ वर्षे अलीकडे ओढला आहे! मग त्याच्याही अलीकडचा काल श १५१५ माघ शु. १५ भानुवासर शिवदिग्विजयकारानीं ( पृ. ३२ ) दिला आहे तो अर्थातच चुकला आहे हें सांगायला नकोच! पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, हाच शिवदिग्विजयकारानीं दिलेला दृष्टांताचा शक १५१५ ( स. १५९२ ) रा. राजवाडे यानीं सर्वांत ग्राह्य म्हणून धरला आहे आणि याला कारण काय, तर त्या वर्षांच्या माघी पौर्णिमेला खरोखरच भानुवासर पडला होता! पण अशा पद्धतीनें जर आपण लेखांचे प्रामाण्य ठरवूं लागलों तर बनावट लेख लिहिणाराची पंढरीच पिकली म्हणायची! ज्याला आपल्या बखरींत नडेल तेथें कल्पनेचा मजकूर लिहावयाचा, त्याला जुनें पंचाग पाहून तिथिवार बरोबर घालणें काय अवघड आहे? या कामांत नुसते तिथिवार बरोबर आहेत एवढेंच पाहून भागावयाचें नाहीं. त्याला इतर गोष्टी कांहीं बाधक आहेत कीं काय हेंही पाहिलें पाहिजे. मालोजीस देवीचा दृष्टांत स. १५९३ त झाला हें खरें मानावयास माझ्या मतें दोन प्रबळ बाधक आहेत. देवीचा दृष्टांत काय झाला? तर अमुक ठिकाणीं अगणित द्रव्य पुरलेलें आहे तें तूं घे. तुझ्या कुळांत एक पुरुष उत्पन्न होईल, तो सांबाचा अवतार होईल व सार्वभौम राजा होईल इत्यादि इत्यादि. शहाजीचा जन्म स. १५९४ त झालेला आहे. यांत कालक्रम असा येतो कीं मालोजीस देवीचा दृष्टांत होतो, त्याची स्त्री दीपाबाई गर्भवती होते आणि तिला पुत्र होतो. अशा प्रकारें देवीच्या अनुग्रहानें प्राप्त झालेल्या पुत्राचें नाव मालोजीनें अंबाजी, भवानजी, तुळजाजी, शिवाजी, उमाजी असें कांहींतरी ठेवावें. निदान महादेवाचें अगर खंडोबाचें तरी ठेवावें, तीं सारीं हिंदु देवांचीं नांवें सोडून मालोजीनें आपल्या मुलाचें शहाजी हें मुसलमानी नाव ठेवलें हें फारच चमत्कारिक दिसतें! देवीच्या दृष्टांतानुरूप मालोजीस द्रव्य सांपडल्यावर तें खर्चून त्यानें दोनतीन हजार फौज ठेविली, तो स्वतंत्र पथक्या झाला, जाधवरावाच्या तोलाचा सरदार बनला हें जर खरें आहे तर पुढें सहा वर्षांनीं 'तू कंगाल शिलेदार माझ्या बरोबरीचा नव्हेस, तुझी माझी सोयरीक कशी होईल,' असा जाधवरावानें मालोजीचा धिक्कार करण्याचें कारण काय? तस्मात् १५९९ त जाधवरावाशीं तंटा झाल्यानंतर कांहीं कालानें मालोजीस देवीचा दृष्टांत झाल्याचा पुकारा झाला म्हणून ग्रांटडफ् म्हणतो तेंच बरोबर आहे. पुरलेलें द्रव्य मालोजीस सापडलें असतां तें त्यानें चोऱ्या करून मिळविलें असावें हा मात्र ग्रांटडफ्चा तर्क कुत्सित व त्याज्य होय.

मालोजीस द्रव्यप्राप्ति झाल्यावर तो फौज चाकरीस ठेवून कांहींतरी साहसाचा पराक्रम करून कीर्ति मिळविण्याची इच्छा करूं लागला. ती संधि त्यास लवकरच मिळाली. त्याचा मेहुणा म्हणजे बायकोचा भाऊ फलटणचा वणगोजी नाईक यानें या सुमारास म्हणजे स. १६०१।२ मध्यें बंडावा करून विजापूरकरांच्या मुलखांत धुमाकूळ घालण्याचा प्रारंभ केला होता त्या बंडांत मालोजी शिरला वणगोजीच्या

पुंडाव्याचे वर्णन वणगोजीनें कऱ्हाडचा कोट घेतला, मोठमोठे सावकार लुटिले, पन्हाळ्यापर्यंत राजिक केलें, असें राजवाडे खंड १५ ले. ३ पृ. १४ वर आलें आहे. वणगोजी कोल्हापुरास रंकाळ्याच्या तळ्यावर उतरला असतां त्यावर अकस्मात् विजापुरकराची फौज चालून आली. ती फौज मालोजीनें अचाट पराक्रम करून नामोहरम केली ती कीर्ति निजामशाहीच्या अधिकाऱ्यांच्या कानीं गेल्यावरून त्यानीं गौरवानें मालोजीस बोलावून आणून चाकरीस ठेवून घेतलें, असें शेडगावकर बखरींत पृ. ४१५ वर लिहिलें आहे तें खरें मानावयास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. मालोजी आतां पुन्हां निजामशाहीच्या नोकरींत शिरला तेव्हां त्याचें सामर्थ्य जाधवरावाच्या बरोबरीचें झालें होतें. पूर्वीचा सगाईचा म्हणजे सोयरिकीचा दावा त्यानें जाधवरावाशीं चालविण्याचा हेतु धरून सरकारांत दाद लावून घेण्यासाठीं मुलखांत आवाडाव मांडिली बखरवाले लिहितात कीं, मालोजीची निजामशहापर्यंत दाद लागून पूर्वी कबूल केल्याप्रमाणें सोयरीक घडवून आणण्याविषयीं निजामशहानें जाधवरावास तबी दिली. आपल्या बरोबरीचे हे सरंजामदार व मनसबदार नाहींत या सबबीवर जाधवराव टाळाटाळ करितोसें पाहून मालोजीस निजामशहानें राजे हा किताब, पंच हजारी मनसब व फौजेच्या खर्चास पुणें, सुपें, चाकण चौऱ्यायशीं, इंदापूरची देशमुखी वगैरे सरंजाम लावून दिला, आणि मुलें माणसें ठेवण्यास शिवनेरीचा किल्ला दिला. हा सरंजाम चै. व. ५ श. १५२५ म्हणजे स. १६०३ मध्यें दिला गेला.

नंतर एक महिन्यानें शहाजी व जिजाऊ यांचें लग्न झालें. ( शिवदिग्विजय पृ. ४३ ) शेडगावकर बखरींत ही लग्नाची मिति मार्ग. शु. ५ श. १५२७ ( स. १६०५ ) दिली आहे व चिटणीस बखरींत लग्नाचा शक १५२६ ( स. १६०४ ) दिला आहे. । ग्रांटडफनें त्याचाच अनुवाद केला आहे. याप्रमाणें निरनिराळ्या बखरींतून जिजाऊच्या लग्नाचे शक १५२५-२६-२७ असे निरनिराळे दिले आहेत यांतला खरा शक कोणता हें निश्चयानें समजण्यास मार्ग नाही शके १५२६ त जिजाऊ आठ वर्षांची होती तेव्हां 'अष्टवर्षा भवेत् कन्या' याच शास्त्राला ज्यांना चिकटून रहावयाचें असेल त्यांनीं पाहिजे तर तोच शक खरा धरावा.

बखरकारानीं मालोजीवर उपकार करण्याचें श्रेय निजामशहा पादशहास दिलें आहे हें ठीकच आहे. पण खरें पाहूं गेलें तर तें श्रेय निजामशाहीचे कारभारी आणि त्यांतही प्रमुखत्वें करून नुकताच उदयास येऊं लागलेला मलिकंबर वजीर यासच आहे. डबघाईस आलेली निजामशाही यावेळीं मलिकंबरास सांवरावयाची होती, जाधवभोसल्यांचें सख्य करून निजामशाही सैन्याचें सामर्थ्य वाढवावयाचें होतें आणि मालोजीसारखा उमदा शूर सरदार जन्माचा उपकारबद्ध करून आज्ञाप्रवण करावयाचा होता, म्हणून धन्याच्या नांवावर हें सर्व त्यानें केलें. मूर्तिजा निजामशहा त्यावेळीं अल्पवयी व अकिंचित्कर होता

बखरी लिहिणाऱ्यानीं जिजाऊशहाजीचें लग्न दौलताबादेस बादशहासमोर झालें म्हणून लिहिलें आहे तिथें मात्र ते सपशेल चुकले आहेत ! कारण स. १६०३।४।५ मध्यें दौलताबाद ही निजामशाहीची मुळीं राजधानीच नव्हती व तिथें पादशहा मुळींच राहत नव्हता. स १६०० त अकबरानें निजामशाहीची राजधानी अहमदनगर काबीज केलें व त्यावेळचा पादशहा बहादुरशहा यास धरून नेलें. नंतर त्या पादशाहीच्या मलिकंबर वगैरे सरदारानीं परांडें येथें गादी नेली आणि निजामशहा विजापुरास आपल्या पणजोळीं रहात होता त्यास आणून गादीवर बसविलें. तेथपासून स १६०७ पर्यंत परांडें हीच निजामशाहीची राजधानी होती स. १६०७ त मलिकंबरानें खडकी शहर वसविलें व शेजारचा किल्ला दौलताबाद येथें निजामशहास आणून ठेविलें. त्या दिवसा पासून दौलताबाद ही निजामशाहीची राजधानी झाली. खडकी शहरासच पुढें औरंगजेबानें औरंगाबाद हें नांव दिलें. असो. बखरवाल्यानीं जिजाऊशहाजीचें लग्न दौलताबादेस झाल्याचें लिहिलें तें चुकलें तर चुको, पण ग्रांटडफनें हा प्रसग वर्णिताना विसरभोळेपणा करावा हें आश्चर्य आहे। तो लिहितो, "Wealth too at a falling Court like that of Ahamadnagar could procure anything and as Jadhav Rao's objection was now confined merely to Maloji's rank, this was soon obviated by his being raised to the command of 5000 horse with the title of Maloji Raja Bhosle. The forts of Shioneri and Chakan with their dependent districts were likewise placed in his charge, and the purganas of Poona and Supa made over to him in Jahagir Thus every obstacle being removed Jadhav Rao had no longer an excuse for not performing what he was urged to by his sovereign." ( Grant Duff P. 42 ) शहाजीच्या लग्नाची वाटाघाट चालू असतां अहमदनगरास दरबार नव्हतें व बादशहा लहान बच्चा होता तें डफच्या स्मरणात राहिलें नाहीं.

दौलताबाद ही निजामशाहीची राजधानी स. १६०७ पासून पुढें सारी २५ वर्षे चालली होती तरी १५ व्या शतकांतल्या मलिक अहमद बादशहास बखरवाले बेलाशक दौलताबादकर म्हणतात ' तसें म्हणणें हें मालोजीस अगर शहाजीस कोल्हापुरचे महाराज म्हणण्यासारखेंच हास्यास्पद होय. मालोजीच्या कुळांत राजे हा किताब पूर्वींचाच होता हें मागें सांगितलेंच आहे आता हा किताब सरकारांतून मंजूर झाला असें म्हणावयाचें मालोजीच्या जहागिरीचें परिगणन मी भीत भीत डफ् व शेडगांवकर बखर ग्रंथावरून केलें आहे. शिवदिग्विजयांत पृ. ४४ वर मालोजीच्या जहा-

गीर परगण्यांची लांबलचक यादी दिली आहे ती रा. राजवाडे सर्व खरी धरतात, पण ती सर्वस्वी खरी असणें शक्य नाहीं. कारण यादींत माळवा व नेमाड प्रांताचे परगणे नमूद आहेत ते मुळीं निजामशहाच्याच कबजात नव्हते तर ते तो मालोजीस कोठून देईल ? ते वगळून बाकीची याद खरी म्हणावी तर पुढें शहाजीनें बळकावलेले व मोंगल बादशहाकडून त्यास जहागीर मिळालेले परगणेही या यादींत घुसडून दिलेले दिसतात.

शहाजीचें लग्न झाल्यावर पधरासोळा वर्षांनीं श. १५४२ ( स १६२० ) सालीं मालोजीचें देहावसान झालें. ( शेडगावकर बखर पृ. ११ ) या सोळा वर्षांत त्यानें निजामशाहीची काय काय कामगिरी केली याचा कोठें उल्लेख नाहीं इतकेंच नव्हे, तर जाधवराव व निंबाळकर यांचें सुद्धां नांव आढळत नाहीं. हिंदु बखरवाल्यांना तर यांतली कांही माहितीच नाहीं. मुसलमान तवारिखवाल्यांकडे पहावें तर मराठे प्रतिपक्षी असल्यास त्यांच्या हालचालींचा ते कांहीं तपशील देतील; एरवीं नांव सुद्धां मराठ्यांचें त्यांस बोलावयास नको ! त्यांच्या ग्रंथांत तुटपुंज्या किंमतीच्या मुसलमान सरदारांची, मुत्सद्यांचीं किंबहुना मारेकऱ्यांचींसुद्धां नावें आढळतील, पण मराठे सरदारांची बोळवण बागी, बरगे, लुगारे इतक्याच शब्दांनीं झालेली सापडावयाची !

मालोजीनें पुष्कळ परोपकाराचीं धर्मकृत्यें केल्याचें वर्णन बखरींतून आहे. त्यांतलीं हल्लींच्या पिढीच्या नजरेस येणारीं म्हटलीं तर शिंगणापूर क्षेत्र येथील तलाव व वेरूळचें घृष्णेश्वराचें देवालय हीं होत.

मालोजीमागून त्याची सरदारी चालविण्याचें जोखीम शहाजीवर पडलें. त्या वेळीं त्याचें वय २६ वर्षांचें होतें. सरदारीच्या कामास तो नवशिका होता असें मात्र नाहीं. बापाच्या हाताखालीं काम करून त्यानें आपली योग्यता यापूर्वीच स्थापन केली होती. ही योग्यता कसोटीस लागण्याचा प्रसंग त्याच वर्षी आला. त्या वर्षी मलिकंबराचें मोंगल सैन्याशीं एक मोठें भयंकर युद्ध झालें ( ग्रांट डफ् पृ ४४ ). त्यांत जरी मलिकाचा पराजय झाला तरी त्याच्या अपयशाचा विभाग शहाजीकडे येऊं शकला नाहीं कारण, मलिकाची बाजू राखण्याकरितां त्या युद्धांत शहाजीनें पराक्रमाची पराकाष्ठा केली. सदहू प्रसंगीं शहाजीचा सासरा जाधवराव व मामा वणंगपाळ नाईक निंबाळकर हेही मोठ्या जवामर्दीनें लढल्याचा इतिहासांत उल्लेख आहे.

या लढाईंत मलिकंबराचा पराजय झाल्यामुळें त्याच्या पक्षास उतरती कळा लागणार असें मानून महत्वाकांक्षी लुकजी जाधवराव निजामशाही सोडून मोंगलपक्षास मिळाला. मोंगल बादशहानें त्याचा पराकाष्ठेचा गौरव करून शहाजाद्यासमुद्धां सहसा मिळावयाची नव्हे अशी चोवीस हजार स्वारांची मनसब त्यास एकदम देऊन टाकली ! यावरून मोगलांस जाधवराव हें केवढें बलाढ्य प्रस्थ वाटत होते हें दिसून येतें. जाधव

राव आपल्या जांवयास म्हणजे शहाजीस मोंगलांकडे ओढून नेण्याविषयीं खटपट करीत होता. त्याप्रमाणें शहाजी जर त्यावेळीं तिकडे गेला असता तर त्यालाही मोठें वैभव व पदवी मिळाली असती. परंतु आपल्या कुळावर उपकार करणाऱ्या मलिकंबराशीं बेइमान होऊन त्याच्या शत्रूस सामील होण्याचें शहाजीनें नाकारिलें. जाधवराव व भोंसले यात पूर्वींपासून ईर्षा व धुसपुस चालूच होती. परतु आतां त्या दोघांत खरोखरीच शत्रुभाव उत्पन्न झाल्यामुळें त्यांचा द्वेष दिवसेंदिवस वृद्धिंगत होत गेला.

शहाजीवर मलिकंबराचा मोठा विश्वास होता व तो त्यास फार मानीत असे. शहाजी हा निजामशाही राज्याचा सरलष्कर झाला होता. ( इतिहास व ऐतिहासिक--शिवकालीन घराणीं--तळबीड मोहिते ले. ३७१ व राजवाडे खड १५ ले. २९८ ) हा सरलष्करचा हुद्दा जवळजवळ सेनापति इतकाच महत्त्वाचा आहे. तो अधिकार त्यास मलिकंबरानें निजामशहाकडून देवविला होता. बहुतेक बखरींतून शहाजीस निजामशहानें वजीर नेमल्याचे उल्लेख आढळतात चिटणीस बखरींत तर हीं वजीरीचीं वस्त्रें मिळाल्याचें साल श. १५४१ ( पृ. २१ ) दिलें आहे. परंतु शहाजी हा निजामशहाचा वजिर म्हणजे मुख्य प्रधान कधीं झाला असेल हें संभवत नाहीं. प्रारभीं मलिकंबर व मागून त्याचा मुलगा फत्तेखान यांचीच वजीरी त्या बादशहाच्या कारकीर्दींत चालली होती. असें असतां बखरवाले जेथें तेथें शहाजी वजीर झाल्याचें लिहितात हें काय ? याचा अर्थ इतकाच कीं, वजीर म्हणजे मुख्य प्रधान असेंच केवळ नव्हे, तर सैन्यांत अथवा राज्यात प्रामुख्यानें अधिकार चालविणारा एक मंत्री. राजकार्यधुरंधर विश्वासनिधि असें ज्यास म्हणतां येईल असा एक अधिकारी. शहाजीप्रमाणें लुकजी जाधवराव यासही बखरकारानीं वजीर म्हटलें आहे त्याचा मेळ असाच अर्थ घेतल्यानें बसतो. "राव रणगपाळ बारा वजीरांचा काळ" या म्हणींतसुद्धां वजीर शब्दाचा हाच अर्थ होय. शहाजी स्वतः राजे महाराजे हा किताब लावीत असे ( श्री सांप्रदायिकविविधविषय पृ. २११ ) व त्यास मोर्चेलें बाळगण्याचा सामंतास प्राप्त होणारा बहुमान मिळाला होता ( शिवदिग्विजय पृ. ४०६ ) तो त्यास मलिकंबरानेंच मिळवून दिला कीं स. १६३३ त विजापुराच्या बादशहानें तिसऱ्या निजामशहास गादीवर बसवितांना दिला, हें नक्की समजण्यास मार्ग नाहीं. बहुधा दुसरीच गोष्ट अधिक संभवनीय आहे ।

मुसलमान इतिहासकार मराठे सरदारांच्या हालचाली पार्थक्यानें नामनिर्देश करून वर्णीत नाहींत हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां शहाजीस सरदारी मिळाल्यापासून मलिकंबर मरेपर्यंतच्या सहा वर्षांच्या अवधींत शहाजीनें काय पराक्रम केले त्याचा उल्लेख मुसलमानी इतिहासांत सांपडत नाहीं याचें नवल वाटावयास नको. तथापि स. १६२४ त मोंगल व विजापूरवाले यांच्या लष्करांवर मलिकंबरानें अचानक

छापा घालून त्याचा धुव्वा उडविला त्यांत चपळ घोडदळाचें साह्य आवश्यक असल्या-मुळें तो प्रसंग घडून येण्याला शहाजीची करामत बऱ्याच अंशीं कारण असली पाहिजे असें वाटतें. जेधे यांच्या शकावलींत भातवडीची लढाई नमूद आहे ती हीच होय ( चतुर्थ सं. पृ. २११ ) त्या छाप्यांत पहिल्याच तडाक्यास लुकजी जाधवराव व माहूरचा देशमुख उदाराम पळून गेले म्हणून निभावले. बाकीचे प्रमुख मोंगल व इदिलशाही सरदार धरले गेले अथवा मारले गेले, आणि त्यांचें सबंध लष्कर मलिक-अंबरानें लुटून फस्त केलें. ( अहमदनगर ग्याझेटियर पृ. २९४. )

* 'शिवभारता' वरून पाहिलें तर शहाजीची स्त्री जिजाऊ हिला शिवाजीसुद्धां सहा अपत्यें झालीं त्यांपैकीं पहिलीं चार अल्पायुषी होतीं. ( शेडगांवकर ब. पृ. ११ ) पांचवें अपत्य संभाजी याचा जन्म स. १६२३ त झाला. जिजाऊच्या लग्नानंतर तीन वर्षांनीं संभाजी झाला असें मि. किंकेड यानीं लिहिलें आहे ती त्यांची नजरचूक हसूं येण्याजोगी आहे ! ( किंकेडचा इतिहास पृ. १२३ ) संभाजी कधीं मरण पावला यासंबधें बखरी लिहिणारांत एकवाक्यता नाहीं. कनकगिरीच्या वेढ्यांत तो मारला गेला त्या वेळी तो बाल्यदशेंत होता असें लिहिण्याचा सर्वांचा झोंक दिसतो; पण ती त्यांची चूक आहे स. १६५३ त संभाजी मरण पावला असें डफ् साहेबानीं लिहिलें आहे तेंच बरोबर दिसतें. मरणाचे वेळीं त्यास तिसावें वर्ष लागलें होतें. संभाजीच्या स्त्रीचें नांव जयंतीबाई व पुत्राचें नांव उमाजी राजे. हा उमाजी वेडसर होता. त्याच्या स्त्रीचें नांव मकाऊ. मकाऊस मूल नव्हतें सबब तिनें दत्तक घेतला. त्याचें नांव परसोजी राजे. मकाऊ व परसोजी राजे यांचीं नावें राजवाडे खंड १५ ले. ५९ मधें आलीं आहेत. संभाजीचे सांप्रतचे वंशज श्री. रा. नारायणराव राजे भोंसले जिंतीकर हे ग्वालेरीस रहातात. शहाजीच्या वंशापैकीं हें वडील घराणें होय.

स. १६२६ त मलिकंबर ८० वर्षांचा होऊन मृत्यु पावला. लहानपणीं तो कोणा एकाच्या घरीं गुलामगिरींत वाढला होता. त्यास निजामशाहीचा माजी वजीर चगीझखान यानें विकत घेऊन वाढविलें व सरकारी कामकाजांत घालून मोठ्या पदवीस चढविलें. तथापि ही आश्चर्याची गोष्ट आहे कीं वयास ५४।५५ वर्षे होत तोंपर्यंत जो मलिकंबर कोणास माहीतसुद्धां नव्हता तो आपल्या आयुष्याच्या शेवटच्या २५ वर्षांत एवढा पराक्रमी निपजला कीं, त्याची कीर्ति महाराष्ट्रांत अजरा-मर होऊन बसली आहे ' आयुष्याच्या उत्तरार्धांत कीर्ति व वैभव प्राप्त होण्याच्या बाबतींत मलिकंबराचें मालोजी भोंसल्याशीं साम्य आहे

ज्या वर्षी मलिकंबर मेला त्याच वर्षी त्याचा प्रतिस्पर्धी विजापुरचा सुलतान इब्राहिम अदिलशहा वारला इब्राहिमच्या मागून त्याचा अल्पवयी पुत्र महमद अदिल-

* रा स. म. दिवेकर यांना मिळालेली शिवाजीची तामील बखर.

शहा गादीवर बसला इदिलशाहीचा खरोखरीचा वजीर मुस्तफाखान हा त्यावेळीं नुसता नामधारी वजीर बनून राहिला होता व कारभाराचीं सूत्रें खवासखान या हंगामी वजीराच्या हातीं आलीं होतीं खवासखानाचा कारभारी मुरारपंत नांवाचा ब्राह्मण होता. मुरारपंत हा शूर व कर्ता मनुष्य असून त्यानें आपल्या धन्याचा विश्वास पूर्णपणे संपादिला होता. यामुळें कोणत्याहि स्वारीस इदिलशाही सैन्य निघालें तरी सैन्याचा मुख्य अधिकार मुरारपंत याजकडेच दिला जात असे खवासखानानें राजधानींत राहून सुलतान व राज्यकारभार संभाळावा व मोहिमा मुरारपंतानें कराव्या असा क्रम अनेक वर्षें चालत होता शहाजीच्या पुढील दहा वर्षांच्या कारकीर्दीशीं या दोघांचा निकट संबंध येत असल्यामुळें त्यांविषयीं येथें थोडी अधिक माहिती देणें योग्य वाटलें

खवासखान हा जातीनें मूळचा मराठा होता त्यास इब्राहिम अदिलशहानें बाटवून मुसलमान केलें व त्यास दौलतयार असें नांव ठेवलें. हा गुलाम आपल्या धन्याच्या विश्वासातला व कृपेंतला असल्यामुळें पुढें दौलतखान ही पदवी पावला व राज्यकारभारांत प्रमुखपणानें वागूं लागला मरणापूर्वी इब्राहिम आदिलशहानें त्यास खवासखान ही पदवी दिली व विजापूरचा सुभेदार नेमिलें, आणि मरते वेळीं आपला अल्पवयी मुलगा व भावी सुलतान महमद अदिलशहा याचा सांभाळ करण्याचें काम त्यावर सोंपविलें. याप्रमाणें ज्याच्या हातीं सुलतान त्याच्या हातीं राज्य असें होऊन खवासखान हा नवीनच वजीर उदयास आला व ज्याला वजिरीचा वास्तविक अधिकार होता तो मुस्ताफाखान निस्तेज होऊन अज्ञातवासांत राहिला. खवासखानाचा कारभारी मुरारपंत हा नागरगांवचा कुळकर्णी. यासच मुरार जगदेव असें म्हणत. विजापूरच्या दरबारांत याला धानतराव अशी पदवी होती.

मलिकंबरामागून त्याचा पुत्र फत्तेखान याजकडे निजामशाहीच्या वजिरीचा अधिकार आला. परंतु बापाचा पराक्रम व अकल यांचा शतांशही नवीन वजीराच्या ठायीं वसत नसल्यामुळें कारभाराचें बस्तान कांहीं केल्या नीट बसेना. सबंध निजामशाहींत शहाजी हा एवढा एकच नामांकित फौजबंद सरदार त्या वेळीं राहिला होता आणि दरबारांतून त्यास प्रोत्साहन व पाठबळ मिळेनासें झाल्यामुळें त्याच्याही कर्तृत्वास कोठेंच वाव सांपडेनासा झाला. निजामशाहीचे मुसलमान सरदार फौजा बाळगून होते ते पराक्रमांत कमी होते असें नाहीं पण त्यांची आपआपसांत भांडणें चाललीं होतीं त्यांतच ते चूर होते. वजीराची नालायकी वर सांगितलीच आहे. मूर्तिजा निजामशहाचा बेअकलीपणा आजपर्यंत मलिकंबराच्या वजनाखालीं झांकून राहिला होता तो आतां उघडपणें जागजागीं डोकावूं लागल्यामुळें राज्यकारभारांत घोंटाळा माजला होता त्यांत अधिकच भर पडली. इतकें असून माजी वजीराच्या हयातींत मोंगलाशीं सुरू झालेलें युद्ध अद्यापि चालूच राहिलें होतें। मलिकंबर वारल्यामुळें आतां मोंगल-

पक्षास अतिशय हुरूप येऊन त्यानें चढाईचें धोरण जारीनें अमलांत आणलें होतें. फत्तेखानास ही युद्धाची बाबटळ आवरेनाशी झाली तेव्हां स. १६२[illegible] मोंगलाशीं निजामशहाच्या मर्जीतला हमीदखान म्हणून सरदार होता त्यानें सख्याचें बोलणें लाविलें. त्या वेळीं दक्षिणचा मोंगल सुभेदार खानजहान लोदी या नांवाचा होता त्यानें निजामशहापासून लांचादाखल भली मोठी रकम घेऊन त्याशीं सख्य केलें व मोंगलानीं घेतलेला सर्व मुलूख पुन्हा परत दिला.

परंतु हा तह फार दिवस टिकला नाहीं खानजहान लोदीच्या दुर्दैवानें याच सुमारास जहांगीर बादशहा मरून त्याच्या जागीं शहाजहान तक्तनशीन झाला. या नवीन बादशहाचें व लोदीचें हाडवैर पूर्वीपासूनच होतें. लोदीनें ठरवलेला तह शहाजहानानें नामंजूर केला व लोदीस दिल्लीस निघून अेण्याविषयीं लिहिलें. त्याप्रमाणें तो तिकडे जाण्यास निघाला असतां दिल्लीस जावें तर बादशहा आपणास जिवें मारील असें भय उत्पन्न होऊन तो दिल्लीची वाट सोडून गोंडवणच्या जगलांत पळाला त्यास धरून आणण्याकरिता बादशाही फौज त्याच्या पाठीस लागली.

वर सांगितल्याप्रमाणे मोंगलाशीं जुळविलेला तह रद्द झाला तेव्हां मोंगल अधिकारी तहांत दिलेला मुलूख फत्तेखानाजवळ परत मागूं लागले. तो देण्याचें फत्तेखानाच्या मनात अर्थातच नव्हतें. तो टाळाटाळ करितोसें पाहून मोंगलानीं बळजबरीनें किल्ले व ठाणीं घेण्याची सुरुवात केली. तेव्हां त्यावर उलट तोड म्हणून फत्तेखानानें शहाजीस सहा हजार फौजेसह खानदेशात स्वारीस पाठविलें. तिकडे शहाजीनें जाऊन तापी व पूर्णा नद्याच्या दुआबांत मोठा धुमाकूळ घातला. शेवटीं मोंगल फौजांनीं चोहोंकडून एकत्र होऊन त्यास खानदेशातून हुसकून लाविलें

इकडे बंडखोर लोदी गोंडवणांत लपला होता तिकडे त्याचा निभाव लागेना, सबब तो बागलाणांत शिरून निजामशाहीच्या सरहद्दीवर सह्याद्रीच्या डोंगराळ मुलखात आश्रय धरून राहिला. मोंगलांस जरबेंत आणण्याकरितां निजामशाही सरकारास असलें खेकटें बगलेंत मारावयास पाहिजेच होतें. त्या सरकारानें त्यास अभय देऊन त्याच्या बचावाची तजवीज केली. मोंगल फौजानीं लोदीपर्यंत हात पोंचावा म्हणून जहांजहात केली. परंतु तो स्वतः मोठा शूर होता व त्याच्या बचावाकरितां निजामशाहीचा सरलष्कर शहाजी हा लढाई घेण्यास मागें पाय घेत नव्हता. त्यामुळें मोंगलाचा कांहींच इलाज चालेना. ही वार्ता ऐकून शहाजहान बादशहा खवळून गेला आणि कुठचा लोदी ! कुठचा शहाजी ! आणि कुठची निजामशाही ! एकदम सर्वांचा विध्वंस करितो !! अशा आवेशानें प्रचंड सेना घेऊन स्वतः दक्षिणेंत आला. तेव्हां निजामशाही राज्यावर मोठा प्रळय गुदरला. खुद्द बादशहाचीच मोहिमेवर देखरेख असल्यामुळें मोंगल फौजांत नवीन चैतन्य उत्पन्न झाल्यासारखें होऊन त्यानीं लोदीचें बंड मोडण्यासाठी पराकाष्ठेची लगट केली. तेव्हां

लोदी सह्याद्रीचीं डोंगराळ जंगलें सोडून विजापुराकडे पळाला. लोदीबरोबर त्याचा सोबती शहाजी ह्याचाही पिच्छा पुरविण्याचा मोंगल फौजेस प्रसंग आला; आणि आम्हाला वाटतें, याच प्रसंगांत शिवाजी महाराजाचा शिवनेरी येथें जन्म झाला.

जाधवराव बरोबर मोंगल फौज घेऊन शहाजीचा पाठलाग करूं लागला. शहाजी-बरोबर जिजाऊ होती तिला शहाजीच्या स्वारीबरोबर धांवणें निभेना, सबब तिला शिवनेरीस जाऊन राहणें प्राप्त झालें. तेथेंच ती प्रसूत होऊन पुत्र झाला तो शिवाजी होय. याप्रमाणें प्रत्येक बखरींत मजकूर लिहिलेला असतो तो ठीकच आहे. तथापि शिवजन्माचा शक रायगड बखरींत १५४८ व इतर बखरींत १५४९ दिला आहे तो चुकला असून जेध्यांच्या शकावलींतला शक १५५१ हाच खरा असणें अधिक संभवतें असे वाटतें. शक १५४९ च्या वैशाख शु. २ ला सन १६२७ चा एप्रिल येतो व जेधे शकावलींतल्या शक १५५१ च्या फाल्गुन व॥ ३ ला सन १६३० चा मार्च येतो दोहोंमध्यें साडे चौतीस महिन्यांचें अंतर पडतें. या दोन शकांत इतिहासाच्या ओघावरून कोणचा शक खरा असणें शक्य आहे? स १६२७ त लढाई बालेघाटाकडे चालली होती. पश्चिमघाटाकडे तिचा संबंध नव्हता. स. १६३० त लढाईची धुमश्चक्री सह्याद्रीच्या लागत्यास, सुरू होती हें वर सांगितलेंच आहे. स. १६२७ त मोंगलांनीं शहाजीचा निकरानें पाठलाग करण्यास विशेष निमित्त नव्हतें. स. १६३० त लोदीच्या बंडाचा बीमोड करण्यासाठीं शहाजीचा झपाट्यानें पाठलाग करण्याचें काम मोंगल सरदारास खुद्द बादशहाच्या हुकमानेंच करावयाचें होतें त्यावरून शिवजन्माचा शक १५५१ हाच असणें अधिक संभवनीय दिसतें आणि या निबंधांत शिवाजीच्या वयाची गणना आम्हीं जागोजाग केली आहे ती १५५१ हाच शक खरा धरून केली आहे.

बखरी लिहिणारांच्या मतें स. १६२७ त शिवाजी जन्मास येण्याच्या सधीस शहाजीस जाधवरावानें विजापुराकडे पिटाळून लाविलें तेव्हां तो तिकडेच इदिलशाहीची सरदारी पतकरून कायमचा रहावयास गेला पुन्हां निजामशाहींत परत आलाच नाहीं. पण हें लिहिणें अर्थातच खोटें आहे सन १६२७ ते स. १६३६ अखेरपर्यंतचीं शहा-जीच्या चरित्राचीं नऊ वर्षें—पुढें शिवाजीला स्वराज्याची शिकवण मिळण्यास आदर्श-भूत झालेलीं हीं नऊ वर्षें—बखरी लिहिणारांनीं अजीबात खाऊन टाकलीं आहेत। त्या मुदतींत निजामशाहीच्या बचावासाठीं अथवा एका अर्थे स्वराज्याची स्थापना कर-ण्यासाठीं शहाजीनें ज्या अचाट मसलती व उलाढाली केल्या त्याची या बखरनविसांना कांहींच माहिती नसावी हें केवढें आश्चर्य ! एक्याणव कलमी बखर, सभासदाची बखर, या बखरी बऱ्याच जुन्या आहेत. तरी त्या लिहून ठेवणारांना आपल्या काळापूर्वी पंन्नास वर्षांत घडलेल्या ठळक ठळक गोष्टींचेंसुद्धां अज्ञान का असावें याचा उमज पडत नाहीं मुसलमानी इतिहासांतून शहाजीचे उल्लेख प्रसंगोपात्त आले आहेत

हें तरी मोठें भाग्यच म्हटलें पाहिजे ! हे मुसलमानी इतिहास बखरींपेक्षा अधिक किमतीचे असतात असें नाहीं. त्यांतही अस्ताव्यस्त मजकूर पुष्कळ भरलेला असतो. एकाच्या लिहिण्याचा दुसऱ्याच्या लिहिण्याशीं मेळ नसतो आत्मप्रशंसेची प्रत्येक गोष्ट फुगवून लिहिण्याची त्यांना संवय असते. आणखीही पुष्कळ दोष या तवारिखांतून दिसून येतात तथापि कांहींच नाहीं त्यापेक्षां असलेही इतिहास शंभरपटीने बरे ! ग्रंथ कितीही दोषसंकुल असला तरी तात्पर्यार्थानें त्यांतला मजकूर शोधक घेऊ शकेल पण जिथें कांहींच साधन नाहीं तिथें कोण काय करणार !

पाठीस लागलेले मोंगल सरदार व जाधवराव परत फिरल्यावर शहाजीस अमळ स्वस्थपणा मिळतो तोंच पावसाळ्याकरितां परांडे येथें फौजेसह छावणी करून रहाण्याविषयीं त्यास निजामशहाचा हुकूम झाला त्यामुळें जिजाबाई व मुलें शिवनेरीस होती. त्यांच्या संरक्षणाची योग्य ती तजवीज करून तो फौजेसह कूच करून परांड्यास गेला व तेथें छावणी करून राहिला

मलिकंबराचा दरारा नाहींसा झाल्यामुळे मूर्ख निजामशहा राज्यकारभारांत ढवळाढवळ करूं लागला होता व ज्यानें स. १६२७ त लोदीशीं तह घडवून आणिला तो हमीदखान त्याच्या विश्वासातला झाला होता हें मागें सांगितलेच आहे. मोंगलाशीं युद्ध सुरू ठेवावयाचें तर फत्तेखान कुचकामाचा माणूस वजीरीवर ठेवून उपयोगी नाहींसें समजून निजामशहानें फत्तेखानास कैदेंत ठेवून हमीदखानास वजीराचें काम सांगितलें, ही गोष्ट स. १६२९ त घडलीसें समजून डफ्साहेब आपल्या इतिहासाच्या पृ. ४५ वर एक वाक्य लिहितात तें असें:– "Sultan Murtiza Nizamshah II on attaining man's estate was naturally desirous of circumscribing the power of the regent, and the violent and inconsistent conduct of Fatekhan rendered this object a matter of easy accomplishment." (page 45). निजामशहानें फत्तेखानास कैद केल्याचें साल १६२९ नसून तें १६३० आहे ही या लिहिण्यांतली पहिली चूक होय. दुसरी चूक १६२९ त निजामशहा वयांत आला म्हणजे २१।२२ वर्षांचा झाला म्हणून साहेब लिहितात ती होय. निजामशहास या वेळीं किती वय असावें याबद्दल शोध करितां असें दिसून येतें कीं, निजामशहाचा बाप शहाअली याचें वय स. १५९५ त सत्तर वर्षांहून ज्यास्ती होतें. ( अहमदनगर ग्याझेटियर पृ. ३८२ ) सत्तर वर्षांचें वय हें मुलें होण्याचें वय नव्हे तथापि त्याच वर्षी म्हणजे स. १५९५ त अलीशहास मूर्तिजा निजामशहा झाला असें धरलें तरी सुद्धा त्या मुलास स. १६२९ त ३४ वर्षें पुरीं झालीं असलीं पाहिजेत. दहावीस अधिकहीं असू शकतील परंतु निदान इतकीं तरी पाहिजेतच. परंतु डफ् साहेबांच्या मनांत वगैरे हिशेब न राहिल्यामुळें त्यांनीं वर उद्धृत केलेलें वाक्य लिहिलें खरें, पण

मागून अहमदनगर ग्याझेटियर ज्यानीं तयार केला त्याना ही चूक भोंवली त्यांनी पृ. ३९६ वर "in 1629 Murtiza Nizamshaha II came of age." असें विधान ठोकून दिलें। त्याच्या मागून मि. किंकेड यानीं आपल्या इतिहासात पृ. ३११–३१२ वर त्याच अर्थाचें पुढील वाक्य लिहिलें "But Fatekhan's power was soon overthrown by the prince for whom Malikambar had created a kingdom. Murtiza Nizamshah II had reached manhood and resented the authority of one whose abilities were of the commonest order." एक चुकला कीं त्याच्या चुकीची आवृत्ति पुन्हा कशी होत जाते हें दाखविण्याकरितांच हें येथें सांगितलें आहे. एरवीं ही बाब अगदीं क्षुल्लक आहे

फत्तेखान कैदेंत पडल्यावर हमीदखानानें निजामशहास समजाविलें कीं, आमच्या राज्यातील प्राचीन सरदार व माहितगार लुकजी जाधवराव मोंगलास मिळाला आहे तो आमच्या राज्यातलीं छिद्रें मोंगलास दाखवून देतो। त्यामुळें मोंगल आम्हास भारी झाले आहेत. याकरितां कसेंही करून जाधवरावाचा बंदोबस्त आधीं केल्याखेरीज मोंगलांवर आम्हांस कदापि जय मिळावयाचा नाहीं! लुकजी जाधवरावाविषयीं निजामशहाच्या मनांत पूर्वीपासून अढी होतीच त्यामुळें नवीन वजीरानें दिलेला हा सल्ला त्याच्या मनात तत्काळ भरला आणि जाधवरावास युक्तीनें बोलावून आणून त्यास कैद करण्याचा त्यानें बेत योजिला. मग त्याप्रमाणें भेटीस येण्याविषयीं निजामशहाकडून जाधवरावास बोलावणें गेलें. त्या वेळीं त्यास लोभाविष्ट करण्यासाठीं कोणचें आश्वासन देण्यांत आलें होतें हें समजत नाहीं. परंतु एवढें मात्र खरें कीं निजामशहाच्या मायावीपणानें लुकजी जाधवरावास भुरळ पडली आणि तो घरच्या मंडळींसह येऊन दौलताबाद शहरबाहेर फौजेचा तळ देऊन राहिला व त्याचा भाऊ जगदेवराव किल्ल्याबाहेर कोतुलुकच्या तळ्यावर उतरला. ठरलेल्या दिवशीं लुकजी जाधवराव आपले पुत्र व नातू व आप्त-स्वकीय लोक बरोबर घेऊन किल्ल्यावर गेला. राजवाड्यांत जातांच या सर्व लोकास असें समजाविण्यात आलें कीं, हुजूरस्वारीस तुमचें भय वाटतें. तुम्ही पहाऱ्यावर हत्यारें ठेऊन आत गेल्याखेरीज हुजूर तुमची भेट घेणार नाहींत। लुकजीच्या मनांत कांहींच पाप नसल्यामुळें त्यानें आपला तरवार सोडून ठेविली व आपल्या अनुयायां-कडूनही तसेंच करविलें. नतर हे सर्व लोक आंत गेले. दरबार झाला निजामशहाची भेट झाली निजामशहा क्षणभर बसून बोलून काहीं निमित्तानें उठून गेला तों दरबा-रच्या दिवाणखान्यात मारेकरी घुसले व लुकजीस कैद करूं लागले. कैदेपेक्षां मरण बरें असें मानून तो लढाईस तयार झाला मारेकऱ्यानीं तरवारी चालविल्या. लुकजी व त्याचे लोक यांच्या कमरेस फक्त कट्यारी राहिल्या होत्या तरी मारेकऱ्यावर चढाई

करून ते मारतां मारतां गतप्राण झाले. या कत्तलींत लुकजीबरोबर त्याचे मुलगे अचलोजी व राघोजी व नातू वसंतराव व दुसरेही कित्येक आप्तइष्ट मारले गेले. ती वार्ता किल्ल्याबाहेर जगदेवराव उतरला होता त्यास कळताच तो व त्याचा मुलगा बहादुरजी तात्काळ स्वार होऊन पळाले ते शिंदखेडास आले मागें लष्करांत लुकजीची बायको गिरिजाबाई होती ( हिलाच एका बखरींत म्हाळसाबाई म्हटलें आहे. ) तिजवर असें हें एकदम आकाश कोसळलें तरी आक्रोश करीत रडत बसणारी ती बाई नव्हती तिनें लोकोत्तर धैर्य धरून जलदीनें आपली फौज तयार करविली. बाजारबुणगे बाड-बिछाद आवरून लादून ती शत्रूच्या देखदेखत शिंदखेडास निघून आली. लुकजीच्या सरदारीस वारस न राहिल्यामुळें मोंगल बादशहानें ती सरदारी लुकजीचा भाऊ जगदेवराव यास दिली त्याच वेळीं जगदेवरावाचा मुलगा बहादुरजी व नातू मानसिंगराव यासही मोंगल फौजेंत निराळ्या मनसबा मिळाल्या पादशहानाम्यांत लुकजीची कत्तल १६३० च्या एप्रिलात झाली असें लिहिलें आहे. परंतु जेध्यांच्या शकावलीवरून ती गोष्ट सन १६३० च्या आगष्टांत ( शके १५५२ श्रावण शु० १५ ) घडली असल्याचें ठरतें.

दरबारच्या कारभारांत हमीदखानाचा फैलावा झाला तेव्हांपासून शहाजीच्या वृत्तींत चलबिचल झालीच होती त्यांतच आपला सासरा व मेहुणे वगैरेंचा निजामशहानें दगलबाजीनें खून केल्याचें वर्तमान कानीं पडतांच त्याचें मन भडकून गेलें. त्याच क्षणीं त्यानें निजामशहाशीं असलेला सेवासंबंध कायमचा तोडून टाकिला तो परांडे येथून कूच करून वाटेनें लुटालूट करीत संगमनेरास आला. नंतर पुण्यास आला तेथें आल्यावर त्यानें मोठीच धामधूम केली व आसपासचा निजामशाही मुलूख बळकाविला व कांहीं लुटून फस्त केला त्या दंग्यात विजापूरकरांचाही काहीं प्रांत लुटला गेला. तेव्हां शहाजीस हुसकून लावण्यासाठीं विजापुराहून मुरारपंताची फौजेसह रवानगी झाली. ती फौज अंगावर येतेसें पाहताच शहाजी पुणें सोडून जुन्नराकडे सरकला. तेथच्या किल्ल्यावर म्हणजे शिवनेरीवर त्याचीं मुलें माणसें होतीं व जुन्नरचा सुभेदार श्रीनिवासराव त्याचा मित्र होता.

शहाजीनें केलेल्या आवाडावीचें उसनें फेडण्यासाठीं मुरारपंत आला. त्यानें त्याच्या जहागिरीपैकीं पुणें व इंदापूर वगैरे जागीं लुटालूट व जाळपोळ केली व पुन्हा शहाजी आपल्या प्रांतात घुसेल तर त्याचा बंदोबस्त करितां यावा म्हणून पुण्यापासून ३०।३२ मैलांवर दौलतमंगळ (भुलेश्वर) नावाचा किल्ला बांधून तेथे दोन हजार फौज ठेविली. नंतर निजामशाही तळकोंकण काबीज करण्याकरितां चंद्रराव मोरे व बाजी दळवी वगैरे सरदारांची रवानगी करून तो परत विजापुरास गेला मोरे व दळवी कोंकणांत उतरले. त्यानीं चौल पासून दाभोळपर्यंत कोंकण सर केलें. पण तें त्यास पचलें नाहीं व निजामशाही सरकारासही परत मिळालें नाहीं ! त्या सरकारांतून पुढच्या वर्षी

शिद्दीसैफ फौज घेऊन कोंकणाच्या बंदोबस्तास आला त्यानें दाजी दळव्यास मारून तो सर्व मुलूख काबीज केला आणि आपणच बळकावला !

जुन्नर प्रांतीं शहाजी रहात होता त्यानें तिकडे भीमगडचा किल्ला, मोडका नादुरुस्त होता तोच नीट करवून त्यास शहागड असें नाव ठेविलें. तेथें राहून त्यानें नाशीक त्रिंबकपर्यंत आसपासचा निजामशाही मुलूख व किल्ले काबीज केले इतकेंच नव्हे, तर जुन्नर पासून संगमनेर, अहमदनगर दौलताबादपर्यंत बालेघाटचा प्रांत कबजांत आणिला. अशा प्रकारें तो मोठा बलाढ्य होऊन बसला.

राज्य करणें व युद्ध करणें हा शहाजीचा कुळधर्मच होता आजपर्यंत त्यानें राज्य व युद्ध केलें तें निजामशाहीसाठीं केलें आतां तर स्वतःच राज्य बळकावून त्याच्या बचावासाठीं युद्ध करण्यासही तो सिद्धच होता. पण अशा रीतीनें नेहमीं झगडाझगड चालवून आपला निभाव लागेल कीं कसें हाही विचार त्यास पहावयाचा होता. गैरसनदी मुलूख वहिवाटणाऱ्यास बंडखोर समजतात आणि बंडखोर म्हटला कीं कोणतेंही सरकार त्यास शत्रु लेखून चिरडण्याचा यत्न करणारच. निजामशाही, इदिलशाही व मोंगलाई अशीं तीन सरकारें या वेळीं दक्षिणेंत होतीं त्यांपैकीं निजामशाहीस तो जुमानीत नव्हता इदिलशाहीशीं त्याचा शीवशेजारापलीकडे संबंध येत नव्हता. पण मोंगल सरकारचें भय वागविणें त्यास प्राप्त होतें, कारण लोदीचा पक्षपाती असल्यामुळें मोंगल सरकारचा त्यावर दांत होता सबब त्या सरकारची ताबेदारी पतकरून तुर्तापुरता आपला बचाव करून घ्यावा असें त्याच्या मैनांत आलें ही ताबेदारी पोट भरण्यासाठीं पतकरावयाची नसून निवळ बचावासाठीं कबूल करावयाची होती. निजामशाहीपैकीं बळकावलेला प्रांत फौजेच्या खर्चाकरितां सरंजाम म्हणून मोंगलाकडून कायम करून घ्यावयाचा व आणखीही कांहीं नवीन मिळवावयाचा वेळ पडेल तेव्हां जुना व नवा सगळाच मुलूख दाबून ताबेदारी झुगारून द्यावयाची असें हें कावेबाज राजकारण होतें.

मोंगल सरकारास तरी शहाजी आपल्या राज्यास उपद्रव देईल हें भय होतेंच. त्याची बहादुरी त्या सरकारास अनुभवानें वारंवार चांगलीच जाणवली होती. मी तुमचा चाकर होतों असें शहाजीनें आपण होऊन बोलणें लावताच त्या सरकारानें तें हर्षानें मान्य केलें. स. १६३० च्या अखेरीस किंवा १६३१ च्या प्रारंभीं शहाजी मोंगल सुभेदार मोहबतखान याच्या भेटीस गेला. त्यावेळीं मोहबतखानाचा मुक्काम पराड्याजवळ तळसंगी येथें होता खानानें शहाजीचा गौरव करून त्यास दोन लक्ष रुपये खर्चास दिले व पांच हजार स्वारांची मनसब दिली. त्याच वेळीं त्याचा भाऊ शरीफजी यास तीन हजार स्वारांची व पुत्र संभाजी यास दोन हजार स्वारांची मनसब मिळाली शहाजीच्या ताब्यांत असलेला सर्व प्रांत त्याजकडे सरंजाम म्हणून मोंगल बादशहानें कायम केला

यानंतर मोहबतखानाच्या हुकुमावरून शहाजी आपल्याच जहागिरींत निरनिराळ्या ठिकाणीं फौजेचा तळ देऊन राहिला होता. प्रथम जुन्नर, मागून संगमनेर, आणि नंतर वैजापूर येथें त्याचें राहणें होत गेलें. त्यानें मुलेंमाणसें शिवनेरीहून काढून वेजापुरास कांही दिवस ठेविलीं होतीं असें कोठें लिहिलें आहे तें याच वेळीं घडलें असावें. या वर्षाच्या पावसाळ्यांत शहाजीची छावणी नाशीक येथें झाली. पंचवटींत श्रीसमर्थ रामदासस्वामी राहिले होते. त्यांचें १२ वर्षांचें अनुष्ठान आता संपत आलें होतें व ते तीर्थयात्रेस निघण्याचा बेत करीत होते. दशपुत्रे यांची आख्यायिका घडून ७। ८ वर्षें लोटलीं होतीं. अर्थात् स्वामीच्या दैवीसामर्थ्याची कीर्ति त्या प्रांतीं चोहोंकडे पसरली होती. अशा महासत्पुरुषाचें दर्शन घडण्याचा सुप्रसंग अनायासें आला असता तो शहाजीसारख्या भाविक धर्मशील माणसानें घालविला असेल हें असंभवनीय होय

बाजी मोहिते अमीरराव म्हणून विजापूरकराचा सरदार होता व ( शेडगांवकर ब. पृ. १५ ). त्याची कन्या तुकाबाई इजशीं शहाजीनें लग्न केलें तें त्याची जिजाऊवर इतराजी असल्यामुळें केलें, असा पुष्कळांचा समज आहे तो चुकीचा आहे तसें मानण्याचें कांहींच कारण नाहीं. पुष्कळ बायका करण्याची राजे लोकांची वहिवाटच आहे. शिवाजीच्या चार किंवा सात बायका होत्या. राजाराम, शाहू, दुसरा संभाजी व तिसरा शिवाजी यांच्या एकाहून अधिक बायका असल्याचीं उदाहरणें शहाजीच्या वंशातलीच आहेत. चिटणिसी बखरींत हें शहाजीचें दुसरें लग्न श. १५५२ त झाल्याचें लिहिलें आहे. त्याच आधारावर डफ साहेबानीं लग्नाचें साल स. १६३० दिलें आहे ( पृ. ५५ ). परंतु हें साल खरें असणें शक्य नाहीं. कारण, त्या वर्षीं शहाजीचा विजापुराशीं कांहींच संबंध नव्हता. शहाजी स. १६२७ त विजापुरकरांच्या चाकरीस राहिला हा बखरी लिहिणाराचा ग्रह त्यास वारंवार भोंवतो, आणि त्यामुळेंच त्यांच्या हातून अशा चुका होतात. स. १६३७ च्या प्रारंभीं शहाजी विजापुरकरांच्या नोकरींत शिरला हें निर्विवाद आहे व तें डफ साहेबांनाहि मान्य आहे. मुलगी विजापुरची, लग्न झालें तेंहि विजापुरास. "बादशहानीं लग्नांत येऊन बहुत सन्मानपूर्वक कामेंगात्र, आटपाडी व खानपूर नजीक पागा व लोक ठेवण्याकरिता बक्षीस दिलें, असें शिवदिग्विजयकार लिहितात हें ( पृ. ५३ ) जर खरें आहे तर स. १६३७ त शहाजी विजापूरकराच्या चाकरींत राहिल्यानंतर केव्हां तरी हें शहाजीचें दुसरें लग्न झालें हें स्पष्ट आहे. लग्नकार्याच्या निमित्तानें धनी बक्षीस देतो तो पदरच्या माणसाला देतो. एरवीं लग्नकार्याबद्दल म्हणून तसें बक्षीस कोणी कोणास देण्याची वहिवाट नाहीं. राजकारणाच्या बाबतींत स. १६३३ पासून १६३६ पर्यंत शहाजीचें व विजापुरकरांचें पूर्णपणें एकचित्त झालें होतें. त्या मुदतींत ही लग्नाची गोष्ट घडली असावी असें कदाचित् मानतां येईल, पण तो गौण पक्ष. मुख्य पक्ष तुकाबाई-शहाजीचें लग्न १६३७ नंतर झालें हाच होय. शेडगांवकर बखरींत पृ. १५ वर बाजी मोहिता मुलगी घेऊन चंदी

चंदावरास गेला व तेथें लग्न झालें असें म्हटलें तें अर्थातच चुकलें आहे पण तेथें दिले-

शक १५६० ( स. १६३८ ) मला सर्वस्वी ग्राह्य वाटतो. तसा तो खराच असेल तर असा तर्क होतो कीं, विजापुरच्या अमलात राहून आपण बाह्यात्कारें तिन्हाईतपणा दाखवावा आणि आतून शिवाजीला उत्तेजन देऊन त्याजकडून स्वतंत्र राज्याची उभारणी करवावी हा बेत शहाजीच्या मनांत घोळूं लागण्याची सुरुवात त्या वेळीं झाली होती. ती मसलत सिद्धीस जावयास आपण जिजाऊ व शिवाजी यांची उपेक्षा करून त्यास दूर ठेविलें असा बहाणा करणें जरूर होतें. त्यास अनुसरून शहाजीनें हा दुसऱ्या लग्नाचा घाट उतरला अर्थात् उदार मनाच्या जिजाऊची या कृत्याला संमति असेलच कारण या म्हणजे स. १६३८ सालीं तुकाबाईच्या लग्नाच्या आगेमागें जिजाऊ शिवाजीस बरोबर घेऊन शिवनेरीहून बेंगरूळास शहाजीस भेटण्याकरितां गेली होती. ( सभासद-बखर पृष्ठ ६ व चित्रगुप्ताची बखर पृ ३ ) या लग्नानें विजापुरकराच्या डोळ्यांत चांगलीच धूळ फेंकली गेली म्हणावयाची !

डफ् साहेबांस कोठें मुसलमानी इतिहासाचा आधार मिळाल्यावरून त्यांनी आपल्या पुस्तकाच्या पृ. ५५ वर असें लिहून ठेविलें आहे कीं, "तुकाबाईचें लग्न झाल्यावर जिजाऊ रुसून माहेरीं जाऊन राहिली. तेथें असतां स. १६३३ त तिला मोंगलांनीं धरून कैदेंत ठेविलें. मोंगल सैन्यात तिच्या सासरमाहेरचे भोंसले जाधव चाकरीस होते त्यांनीं 'हिला नवरा विचारीतसुद्धां नाहीं, हिला कैदेंत ठेवून काय उपयोग ? यानें आमच्या इज्जतीस बट्टा लागतो,' असा अर्ज केल्यावरून मोंगल अधिकाऱ्यांनीं तिला सोडून दिलें. ती धरली गेली तेव्हां तिनें शिवाजीस कोठें लपवून ठेविलें हें कळलें नाहीं तो शत्रूच्या हातीं लागेल म्हणून ती त्यास फार जपत असे व तिच्या सावधपणामुळें त्याचा पुष्कळ वेळां बचाव झाला " डफ्चाच अनुवाद मि किंकेड यांनीं आपल्या इतिहासाच्या पृ.१२४ वर केला आहे व आणखी अशी माहिती दिली आहे कीं,"मोंगलांकडे फितूर झालेला त्रिंबकचा निजामशाही किल्लेदार महालदारखान यानें जिजा-बाईस पकडलें त्या वेळीं बाईनें शिवाजीस कोठें लपवून ठेविलें होतें. त्यामुळें तो मोंगलांच्या हातीं लागला नाहीं. ती मात्र कोंडाणा ( सिंहगड ) किल्ल्यावर स १६३३ पासून १६३६ पर्यंत तीन वर्षें कैदेंत होती." हें सर्व भारूड या दोघा साहेबांनीं लिहून ठेविलें आहे खरें, पण यांतलें अक्षरसुद्धा आम्हांस खरें वाटत नाहीं । इतक्या मराठी बखरी छापल्या आहेत त्यात या गोष्टीचा गधहि नाहीं. अस्सल पत्रें-यादींचा पुरावा म्हणावा तर तोहि नाहीं. आणि वस्तुस्थितीवरून संभव पहावा तर तो नाहींच नाहीं ! आधीं मुळीं १६३० त शहाजीचें दुसरें लग्न झालें हेंच खरें दिसत नाहीं मग जिजाऊनें रुसून माहेरीं जावें केव्हां ? नवऱ्यावर रुसून तिनें माहेरीं कुणाकडे जावें ? बाप, भाऊ भाचे सर्व मेलेच होते. ती शिवनेरीस कशी आली हें मागें लिहिलेंच आहे. तेथून ती

एकदां वेजापुरास गेली होती. तेव्हां तिला शहाजीनेंच नेलें होतें. त्याखेरीज ती शिवनेरीहून कधीं हाललीच नाहीं. जुन्नर घ्यावें, शिवनेरीचा किल्ला घ्यावा, तेव्हां जिजाऊ मोंगलाच्या हातीं लागणार, पण स. १६३६ च्या एप्रिल मेपर्यंत शहाजीनें मोंगलांस मुळीं जुन्नराकडे येऊच दिलें नाहीं. हें पुढच्या लिहिण्यावरून दिसून येईलच. स. १६३६ च्या मे महिन्यांत मोंगलांनीं जुन्नर घेतलें तेव्हां ती शिवनेरी सोडून माहुलीस गेली ती स. १६३६ च्या आक्टोबरांत शत्रूशीं तह ठरला तेथपर्यंत माहुलीसच होती. तात्पर्य, मोंगलांनीं जिजाऊस कैदेंत धरून ठेवल्याचा हा सारा ग्रंथ 'चित्रकर्मरचना भित्तिंविना वर्तते' अशांतलाच प्रकार होय !

शहाजीनें सारी २२।२३ महिने मोंगलांची चाकरी केली त्यानंतर तो त्याची नोकरी सोडून त्यांच्याच विरुद्ध एक प्रचंड कारस्थान उभारण्यास प्रवृत्त झाला. तो प्रकार सांगण्यापूर्वी तेथपर्यंत दौलताबादेस काय वर्तमान घडून आलें होतें याचा खुलासा आधीं केला पाहिजे मागें बंडखोर लोदी विजापुरास गेल्याचें लिहिलें आहे त्याची तेथें डाळ शिजली नाही, त्यामुळें तो तेथून निघाला आणि दौलताबादेस येऊन निजामशहाच्या पाठीस पडला. अर्थात् मोंगल फौज निजामशहावर चालून आली. त्यानें धैर्य धरून मोंगलांशीं लढाई दिली पण तींत त्याचा पराजय झाला नंतर लोदी काबुलाकडे जाण्याचा बेत करून निघाला असतां तिकडेच वाटेंत मारला गेला. असो या नवीन पराजयानें निजामशहाचें मन फारच निराश झालें.

गेल्या चार वर्षांत मोंगलांनीं उद्योग करून त्याचें बालेघाटचें राज्य बरेंच व्यापीत आणिलेंच होतें. त्यांनीं स. १६२८ त बीड घेतलें, १६३१ त धारूर घेतलें, १६३२ त जालना घेतलें आणि आतां त्यांच्या हालचालींचा रोंख पराड्याकडे वळला होता. पुढें सर्व दौलत गारद होणार असें पाहून ती वांचविण्यासाठीं निजामशहानें फत्तेखानास कैदेंतून सोडलें. तो उपकार फेडण्यासाठीं फत्तेखानानें दोन महिन्यांतच निजामशहाचा खून केला ! मग निजामशहाचा मुलगा हुसेन यास गादीवर बसवून त्यानें मोंगल सुभेदार मोहबतखान यास सांगून पाठविलें कीं ' मी हें सर्व तुम्हांकरितां केलें. सर्व निजामशाही राज्य तुमचें आहे या, माझ्या पोटाची सोय करा, आणि दौलताबादसुद्धा सर्व दौलत हवालीं करितों ती घ्या ! ' तो निरोप जातांच मोहबतखानास हर्ष झाला आणि त्यानें दौलताबादेस पाठविण्याकरितां फौज तयार केली.

याप्रमाणें फत्तेखान आपण होऊन निजामशाही राज्य मोंगलांच्या स्वाधीन करणार हें पाहून शहाजीस फार वाईट वाटलें. त्याला निजामशहा नकोसा झाला होता पण निजामशाहीचा आस्था त्यानें सोडली नव्हती त्यानें मोंगल सरदारीस लाथ मारून पुन्हां आपलें स्वातंत्र्य पुकारलें व त्रिंबकचा किल्ला घेऊन हां हां म्हणतां उत्तर कोंकण काबीज केलें शहाजी व शरीफजी हे सख्खे भाऊ. पण शहाजी मोंगलांशीं लढण्याकरितां दंड थोपटून उभा राहिला आणि शरीफजीच्या अंगांत ती हिम्मत नसल्यामुळें

तो आपली सरदारी संभाळून मोंगलांस चिकटूनच राहिला! शहाजीबरोबरच त्याचे चुलत भाऊ मालोजी, परसोजी व खेळोजी मोंगलांच्या चाकरीस राहिले होते ते हि शहाजीस सोडून मोंगलांकडे च राहिले.

मागें एकदां विध्वंस पावलेल्या निजामशाहीचें मलिकंबरानें पुनरुज्जीवन केलें त्याप्रमाणें आपणाहि उद्योग करावा अशी शहाजीनें ईर्षा धरिली. मोंगलांशीं झगडून निजामशाहीची पुन्हां स्थापना करावयाचें काम त्याला एकट्याला करतां येणें अशक्य होतें. त्या कारस्थानांत कोणा तरी बलिष्ठ राजाची कुमक मिळविणें त्यास जरूर होतें. विजापुराहून अशी कुमक मिळेल हें त्यास ठाऊक असल्यामुळें त्यानें तिकडेच संधान बांधून आपलें राजकारण तडीस नेलें

निजामशाहीसंबंधें विजापुरचें राजकीय धोरण कसें असावें याबद्दल तेथील दरबारांत पूर्वीपासून दोन पक्ष होते एकाचा प्रवर्तक माजी सुलतान इब्राहीम आदिलशहा हाच खुद्द होता. दुसऱ्या पक्षाचा पुरस्कर्ता वजीर मुस्ताफाखान होता इब्राहीमचें म्हणणें, निजामशाही बुडूं दिली तर मोंगलाची धाड आपल्या राज्यावर येऊन पडेल. याकरितां ती दौलत हरतऱ्हा करून वाचविली पाहिजे मुसताफाखानाचें म्हणणें, मोंगलांशीं स्पर्धा करण्याच्या भरीस न पडतां ते व आपण निजामशाही निम्मेनिम वांटून घ्यावी हल्लीं मुस्ताफाखान मागें पडला होता, व इब्राहिमच्या पक्षाचे अभिमानी खवासखान व मुरारपंत यांच्याच हातीं कारभाराचें सर्व तंत्र आलें होतें. त्यामुळें शहाजींकडून निजामशाहीच्या बचावाविषयीं बेत येताच त्यांनीं ते औत्सुक्यानें कबूल केलें मोंगलांनीं बालेघाटचा मुलूख बीड, धारूर वगैरे घेऊन इदिलशाहीच्या शिवेला आपली शींव आणून भिडविली, तेव्हांपासून विजापुरकरांच्या पोटांत आंवळे शिजू लागलेच होते स्वतःच्या बचावाकरितां तरी शहाजीच्या मसलतींत सामील होऊन मनापासून खटपट करणें त्यांस प्राप्तच झालें होतें

वर सांगितल्याप्रमाणें कारस्थानाचा बनाव घडून आल्यावर स १६३३ च्या प्रारंभीं शहाजी फौज घेऊन विजापुराकडे गेला त्याच्या मदतीस तिकडून रणदुल्लाखान आला. मग हे दोघे फत्तेखानापासून दौलताबाद घेण्यासाठीं निघाले. तों मोंगल सुभेदार मोहबतखान याचीहि फौज त्याचा पुत्र खानजमान याजबरोबर त्याच कामाकरितां निघाली. तेव्हां जलदी करून विजापुरवाले व शहाजी दौलताबादेस आधीं पोंचले व किल्ल्यास वेढा घालून बसले. फत्तेखानानें शहाजीस सांगितलें कीं, किल्ल्यांत खावयास धान्य नाहीं व शिबंदीचा पगार तटल्यामुळें ते लोक माझें ऐकत नाहींत.• याकरितां तीन लक्ष होन व पोटापुरतें धान्य द्या म्हणजे किल्ला तुमच्या हवालीं करितों. त्याप्रमाणें विजापुरवाल्यांनीं धान्य व द्रव्य देतांच तो त्यास उलट उत्तरें सांगू लागला इतक्यांत मोंगल फौज दौड करून आली लगेच वेढ्यास गुतलेल्या रणदुल्लाशीं व शहाजीशीं मोंगलाची लढाई जुंपली. मोगलांनीं निजामपुऱ्यात शहाजीचे मोर्चे होते तेथून

१७६४.

त्यास हुसकून लाविलें व विजापूरवाल्यांस मार्ग सारून स्वतःच किल्ल्यास वेढा घातला. मग शहाजीनें मोंगल सैन्याची रसद बंद करून व त्यांवर छापे घालघालून त्यास टेकीस आणिलें. तें वर्तमान मोहवतखानास कळताच तो स्वतःच दौलताबादेस मोठी फौज घेऊन मार्च महिन्याचे प्रारंभीं आला. इकडून मुरारपंतहि मोठ्या फौजेनिशीं शहाजीच्या कुमकेस मे महिन्यांत आला. उभयपक्षीं प्रत्यहीं तुमुल युद्धें होत असत. अजूनहि फत्तेखान 'आणखी धान्य द्याल तर किल्ला देतों' असें मुरारपंतास म्हणतच होता! पण मुरारपंतास त्याचा विश्वास नसल्यामुळें तो त्याच्या नादीं लागला नाहीं मोहबतखान व मुरारपंत यांजवळ फौजेचा भरणा समसमानच होता. परंतु विजापुरच्या लष्करांतले मुसलमान सरदार आपल्या हिंदू सेनापतीचे हुकूम मानण्यास फारसे राजी नव्हते त्यामुळें शहाजी व मुरारपंत यांची खटपट व्यर्थ झाली। पांच चार महिने झटपट खाऊन शेवटीं त्यास मागें हटावें लागलें. नंतर मोंगलानीं ता १७ जून स १६३३ रोजी दौलताबाद घेतली, सुलतान हुसेन यास कैद केलें व फत्तेखानास सालिना वीस हजार रुपयांची नेमणूक करून देऊन स्वस्थ बसविलें

किल्ला काबीज झाल्यावर त्याचा बंदोबस्त करून मोहवतखान परत गेलास पाहतांच शहाजी मागें उलटून पुन्हां दौलताबादेवर धावून आला; व मोंगलांचे मोर्चे होते तेच धरून किल्ल्यास पुन्हां वेढा देऊन बसला. परंतु ह्या खेपेच्या मोंगल किल्लेदारानें मर्दुमीनें लढाई देऊन त्यास वारंवार धुडकावून लाविलें. तों तें वर्तमान मोहबतखानाच्या कानीं जातांच तो त्वरेनें परत येऊन पोंचला तेव्हा शहाजी वेढा उठवून विजापुरास आला. याप्रमाणें दौलताबाद शत्रूच्या हाती गेली आणि निजामशाही बुडाली असें पाहून विजापुरकर निराश झाले. परतु शहाजीची हिंमत खचली नाहीं. तो त्यांस म्हणाला की, निजामशाहीचे ८४ किल्ले आहेत त्यांपैकीं एक दौलताबाद गेली तरी त्याची काय विशाद आहे? तुम्ही कुमक करीत असाल तर पुन्हां निजामशाहीची स्थापना केल्याखेरीज मी सोडणार नाहीं. तेव्हां विजापुरवाल्यांनी आश्वासन दिलें कीं, तूं जी मसलत करिशील ती पार पाडण्यासाठीं आम्ही कायावाचामनें करून झटूं, तुला सोडणार नाहीं उभय पक्षीं आणा शपथा झाल्यावर पुढें काय तजवीज करावयाची तें ठरवून शहाजी जुन्नरास परत आला व मोठी फौज ठेऊन निजामशाहीचा आणखी मुलूख काबीज करण्याचा त्यानें उपक्रम सुरू केला. याच वेळीं त्यानें खानदेशचे २७ किल्ले घेतले शहाजी काय करणार याची कुणकूण मोहबतखानास कळली होती शहाजीचे चुलत भाऊ परसोजी व मालोजी मोंगल सैन्यात चाकरीस होते त्याच्या मार्फत दौलताबादेच्या किल्लेदाराकडून शहाजीकडे प्रेष आला की, "बावीस हजार स्वारांची मनसबी तुला दिल्याबद्दलचीं फर्मानें बादशहाकडून आणून ठेविलीं आहेत तू योजलेला विचार सोडून पुन्हा आमचा ताबेदार हो. तुझे मुलगे संभाजी व शिवाजी याच्या नांवें आणखी दौलत देऊ, तूं काय मागशील तें या वेळी बादशाकडून मिळवून देतों." पण

शहाजीनें या म्हणण्याचा धिक्कार केला ( काव्येतिहाससंग्रह. पत्रें यादी ४३८ ). जुन्नरच्या पश्चिमेस ३० मैलांवर जीवधन म्हणून किल्ला आहे त्यालाच अंजराई असें म्हणतात. त्या किल्ल्यांत मूर्तिजा नांवाचा एक निजामशाही राजपुत्र कैदेंत होता. त्यास शहाजीनें मुक्त करून शहागडास ( भीमगडास ) आणून आगष्ट महिन्याच्या अखेरीस तक्तावर बसविलें शहाजीनें मूर्तिजास श्रीवर्धनाहून आणिलें, असें कोठें म्हटलें आहे तें खरें दिसत नाहीं कारण, श्रीवर्धन त्या वेळीं शिद्दी सैफ याच्या ताब्यात होतें व शहाजीचें त्या शिद्दीशीं वांकडें होतें सबब श्रीवर्धनच्या जागीं जीवधन असें नांव मुसलमानी इतिहासांत दिलें आहे तें बरोबर आहे

या नवीन सुलतानास तक्तावर बसविण्याकरितां विजापुराहून मुरारपंत फौजेसह मुद्दाम आला होता या कारस्थानांत त्यास असा देखावा दाखवावयाचा होता कीं, विजापुरच्या बादशहानें निजामशाहीचा हा नवीन सुलतान मूर्तिजा यास गादीवर बसवून शहाजीस त्याचा वजीर नेमिलें; आणि त्याच्या राज्याच्या संरक्षणाचा जिम्मा वडीलपणानें आपणांकडे घेतला पेशवाई कारकीर्दींत राघोबास हुसकून लावून त्याच्या जागी गंगाबाई व सवाई माधवराव यांची स्थापना करण्यांत निजामअलीनें असाच पुढाकार दाखवून स्वतःस काकासाहेब म्हणवून घेतलें पण त्याची ती काकासाहेबी पोकळ शाब्दिक होती. पेशवाईकरितां पदरास खार लावून घेण्याची वेळ आली तर तो तें नातें पार विसरून जाई. महमद आदिलशहाची काकासाहेबी परिणामीं अशीच फोल ठरली. तो प्रकार पुढें सांगण्यांत येईल. शहाजीनें उभारलेल्या मसलतींत सामील झाल्याबद्दल त्यानें विजापुरकरांस काय द्यावयाचें ठरविलें होतें हें कोठें लिहिलेलें नाहीं. तथापि असें अनुमान होतें कीं, भीमा व सीना या नद्यांमधले वागी वगैरे साडेपांच महाल आणि सोलापूर व परांडा हे दोन किल्ले विजापुरकरानीं कुमकेचा मोबदला म्हणून मागितले असाव व शहाजीनें ते दिले असावे. पूर्वी सोलापूरच्या किल्ल्यासुद्धां हे साडेपांच परगणे चांदबिबीच्या लग्नात विजापुरकरास आंदण दिलेले असता अलीकडे भातवडीच्या लढाईनंतर मलिकंबरानें ते त्यांपासून घेतले होते व ते परत मिळविण्याविषयीं विजापुरचे मुत्सद्दी फार उत्सुक होते

नूतन सुलतानाच्या राज्याभिषेकाचा समारंभ आटोपल्यावर अबरखान याच्या हाताखालीं पांचसहा हजार फौज शहाजीच्या कुमकेकरितां ठेवून सप्टंबर महिन्यांत मुरारपंत विजापुराकडे परत निघाला वाटेंत भीमा व इंद्रायणी याच्या संगमावर नागरगांव नजीक त्याचा मुकाम असतां ता. २३ सप्टेंबर या दिवशीं सूर्यग्रहण पडलें. त्या वेळीं त्यानें तेथें नाना प्रकारचीं दानें व तुळा केल्या. त्या दिवसापासून त्या गांवास तुळापूर हें नांव पडलें हत्तीची तुळा कशी करावयाची ती शकल याच प्रसंगीं शहाजीनें मुरारपंतास सुचविल्याची आख्यायिका प्रसिद्ध आहे

सरकारचा मुलूख सरकारांत देऊन नवीन सुलतानाचें धनीपण मान्य करण्याविषयीं शहाजीनें शिद्दीसैफ यास तंबी दिली. तेव्हां शहाजीची जबरदस्ती पाहून महाडपासून जव्हारपर्यंतचा कोंकणपट्टी त्यानें त्याच्या हवालीं केली. मात्र सुलतानाच्या भेटीस येण्याचें व सरकारचा हत्ती वगैरे अजबाब स्वाधीन करण्याचें त्यानें नाकारिलें त्याच्या मनांत विजापुरास पळून जावयाचें होतें. सबब "निजामशाहीची मला ताबेदारी नको, मी तुम्हाकडे येतों," असें मुरारपंताशीं बोलणें लावून तो त्याच्या भेटीकरिता आला, तों पावळ कडूसा जवळ खेड येथें शहाजीनें त्यास गांठिलें. तेव्हां लढाई होऊन शिद्दी खेडच्या ठाण्यांत कोंडला गेला व त्याचे हजारों लोक मारले गेले. अखेर मुरारपंतानें शहाजीची समजूत घालून शिद्दीसैफ यास सोडवून आपणाबरोबर विजापुरास नेलें.

यानंतर निजामशाहीचे पुष्कळ परगणे व किल्ले शहाजीनें काबीज केले, तथापि नवीन सुलतानाकरितां राजधानीची योजना अद्यापि व्हावयाची होती राजधानी होण्यास जुन्नर शहर बरें आहे असें त्याच्या लक्ष्यांत आलें. तेथला अधिकारी श्रीनिवासराव त्याचा मित्र असून निजामशाहीचा इमानी सेवक होता. तो स्थळ देण्यास हरकत करणार नाहीं असें त्यास वाटत होतें. म्हणून श्रीनिवासराव यास त्यानें बोलावून नेऊन सांगितलें कीं, राहण्याकरितां सुलतानाला जागा नाहीं, सबब जुन्नर व त्याच्या घेऱ्यांतले किल्ले तुझ्या हवालीं केलेले आहेत ते सरकारांत दे आम्ही तुझी दुसरीकडे सोय करितो. परंतु तो काहीं केल्या ऐकेना.अखेर शहाजीचा नाइलाज होऊन त्यानें त्यास कैद केलें आणि जुन्नर बलात्कारानें ताब्यांत घेऊन श्रीनिवासरावाची सर्व दौलत सरकारांत घेतली नंतर सुलतान जुन्नरास येऊन राहिला या वेळीं जुन्नरच्या आसपासचे जे किल्ले शहाजीच्या कबजांत आले त्यांचीं नावें जीवधन, परशगड, हर्षगड, माहुली, सुंडा व खूज अशीं मुसलमानी इतिहासांत दिलीं आहेत त्यांतलीं शेवटचीं दोन कोणच्या किल्ल्यांचीं आहेत हें उमगत नाहीं तुझ्या मुलीशीं संभाजीचें लग्न करावयाचें आहे, असा बहाणा करून शहाजीने श्रीनिवासरावास भेटीस बोलाविलें आणि दगा केला असें हे मुसलमान इतिहासकार लिहितात! श्रीनिवासराव हा ब्राह्मण होता व त्याच्या मुलीचें मराठ्याशीं लग्न व्हावयाचें नाहीं हें यांना काय ठाऊक! शिद्दीसैफ व श्रीनिवासराव यांचें पारिपत्य झाल्यावर शहाजीचें वजन वाढत चाललें व इकडे तिकडे भटकणारी निजामशाही बारा तेरा हजार फौज आपण होऊन त्याजकडे आली व चाकरीवर हजर झाली.

परांड्याचा किल्ला घेण्याचे बेत मोंगल करीत होते हें मागें सांगितलेंच आहे. हल्लीं त्यांनीं ते बेत अमलात आणावे तों आधींच किल्लेदारास तीन लक्ष होन देऊन विजापुरकरांनीं तो किल्ला घेतला. तेव्हां मोहबतखान क्रुद्ध होऊन त्यानें परांडा त्यांपासून

घेण्यासाठीं शहाजादा सुजा यास मोठें सैन्य बरोबर देऊन पाठविलें. सुजानें जाऊन परांड्यास वेढा घातला तों मुरारपंतानें किल्ल्याच्या कुमकेस आणखी फौज पाठविली आणि लढाईचा हंगामा सुरू केला व आपल्या बाजूनें उठावणी करून मोंगलांस पायबंद बसविण्याविषयीं शहाजीस निकडीचीं पत्रें पाठविलीं.

तीं पत्रें येतांच शहाजीनें अहमदनगराजवळ भली मोठी फौज गोळा केली आणि दौलताबाद व बेदर या प्रांतावर स्वारी करून तिकडील मुलूख लुटून फस्त केला. त्या धामधुमींत त्यानें वाटा बंद पाडून इकडचें माणूस तिकडे फिरकूं दिलें नाहीं व मोंगल लष्कराकडे जाणारीं कारवानें लुटलीं. शहाजीनें असा धुंडावा माजविल्याचें ऐकून त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं मोहबतखानानें फौज पाठविली. परंतु शत्रु अंगावर चालून येतोसें पाहातांच त्या फौजेनें पळ काढून आपला मूळचा मुक्काम गाठला. शहाजीनें असा ताण बसविल्यामुळें सुजाच्या लष्कराची रसद बंद होऊन त्यास उपाशीं मरण्याची पाळी आली. मुरारपंताचा उपद्रव तर त्याच्या लष्करास एकसारखा सुरूच होता. अशीं संकटें प्राप्त झालीं तेव्हां स. १६३४ च्या मे महिन्यांत परांड्याचा वेढा उठवून सुजास परत जावें लागलें.

शहाजादा सुजा परत गेला तरी शहाजीनें मोंगलाई मुलखांत धामधूम सुरूच ठेविली होती. पावसाळ्यांत विश्रांतीसाठीं फौजा कुठें तरी छावणी करून राहतात, पण त्यानें स्वतः विश्रांति घेतली नाहीं व शत्रूसहि चैन पडूं दिलें नाहीं. याचें कारण असें कीं, शहाजीचें राज्य नविन होतें स्थळाच्या बाजूनें तो अजून कमकुवत होता. अहमदनगर, दौलताबाद, विजापूर अशासारखें एकहि मातबर स्थळ त्याजवळ नव्हतें शत्रूस स्वस्थ बसूं द्यावें तर आपणावर चढाई करण्याचे विचार त्यास सुचूं लागणार. त्यानें सर्व बळ एकवटून आपणावर मारा केला तर आपला निभाव कितपत लागेल ? जुन्नर ही लढविण्याची जागा नव्हे येऊन जाऊन चार डोंगरी किल्ले आहेत त्यांचा आसरा धरावा तर आपलाच कोंडमारा करून घ्यावा, कोंकणचीं भिकार खेडींपाडीं शत्रूकडून उध्वस्त करवावीं, त्यात काय नफा ? त्यापेक्षा शत्रूच्याच मुलखात लढाई पाडून त्यास नेहमीं व्यग्र ठेवावें यांतच बचाव आहे. या योगानें आपलें घर सुरक्षित राहतें आणि शत्रूच्या मुलखावर परभारें पोट भरतें. याप्रमाणें त्याची विचारसरणी होती व तीस अनुसरून त्यानें सबंध स. १६३४ सालीं लुटालूट करून मोंगल अधिकाऱ्यास त्राहि त्राहि केलें. कोणीहि त्यास पराजित करू शकला नाहीं

सन १६३४ च्या आक्टोबरांत मोहबतखान सुभेदार मरण पावला. ज्यानें एका वेळीं खुद्द जहांगिर बादशहाला कैद केलें होतें तोच हा प्रख्यात योद्धा मोहबतखान. त्याला शहाजी कांहीं तरी वचकत असे. पण तो मेल्यावर शहाजीचें चांगलेंच फावलें. त्यानें दौलताबाद प्रांतांत खेड्यापाड्यांतून निर्भयपणानें ठाणीं बसवून नवीन मूर्तिजाच्या

नांवें बेधडक सारा वसूल करण्याची व्यवस्था लाविली । त्याचा अमल दौलताबादेच्या दरवाजापर्यंत येऊन पोंचला. मोंगलाकडून आणखी उपेक्षा होत गेल्यास किल्ल्यास चौक्या बसवाव्या, विजापुराहून कुमक आणून मोर्चेबंदी करावी आणि वेढा बसवावा येथपर्यंत या धिटाईचा पल्ला पोंहचावयाचा होता !

मोहबतखानामागून सुभेदारीच्या कामावर आलेला खानडौरान ताज्या दमाचा होता. एवढी फौज आपणाजवळ असता शहाजीनें बेजरब आपला मुलूख लुटावा, हें त्यास साहजिकच लाच्छनास्पद वाटलें त्याने स. १६३५ च्या प्रारंभी शहाजीवर मोहीम करण्याची तयारी केली. तें पाहतांच शहाजीनें दोन हजार स्वारांची निराळी टोळी करून तिजवर आपला थोरला मुलगा संभाजी यास मुख्य नेमिलें व त्यास संगमनेरास ठेविलें. त्या ठाण्याचे रक्षण करावें आणि वेळ पडल्यास जुन्नरची कुमक करावी हें काम त्याजवर सोंपविलें होतें संभाजीचें वय त्या वेळी बारा वर्षांचें होतें! आणखीहि जिल्ह्याळ्याचीं जागजागी ठाणीं होतीं त्यांच्या बचावाची तजवीज करून शहाजी आपणावर चालून येणाऱ्या मोंगल सुभेदाराची वाट पहात राहिला.

खान डौरान चालून आला तेव्हां त्याजवळ संख्येनें २५ हजारावर फौज असावी शहाजीजवळ त्याच्या निम्म्यानेंहि नव्हती ! अर्थात् त्याची आपण सहज दाणादाण करू, असें खानमजकूर यास वाटत होतें· शहाजीचे कर्तृत्व त्याला अद्यापि माहीत नव्हतें गनिमी काव्याच्या लढाईत मालिकंबराएवढा सेनापति साऱ्या हिंदुस्थानांत कोणी झालाच नाहीं त्यानें त्या पद्धतीनें लढून मोठमोठ्या अनेक मोंगल फौजा बुडविल्या होत्या. त्याच्या तालमेत शिकून तरबेज झालेल्या शहाजीस संख्येनें दुप्पट असलेल्या शत्रूचें तरी काय भय होतें! खान डौरान चालून येतांच शहाजी दौलताबादेच्या आसपास होता तेथून निघून रामदुर्गाकडे गेला आणि तो परगणा लुटूं लागला तों मोंगल सुभेदार पाठीवर आला तें पाहतांच तो तेथून उठून शेवगाव परगण्यांत घुसला तेथून मोहरीच्या घाटानें निसटून पारगांवाकडे आला. याप्रमाणें सहा महिनेपर्यंत शहाजीच्या पाठीस लागून धांवता धावता मोंगल फौज थकली, पण एकदांसुद्धां त्याची गाठ पडली नाहीं त्यानें आपलें बुनगें जुन्नरकडे लावून दिलें होतें तें मात्र मोंगलाच्या हातीं लागलें. तेवढ्यावरच संतोष मानून खान डौरान पावसाळ्याच्या छावणीकरीतां मुक्कामास परत गेला आणि शहाजीच्या लुटालुटीचें सत्र आणखी जोरानें चालू राहिलें !

गेलीं तीन वर्षें शहाजीनें स्वातंत्र्याचा उपभोग निर्धास्तपणानें घेतला. त्यानें किल्ले घेतले, ठाणीं बसविलीं, प्रांत लुटले, दहाबारा हजार चपळ घोडेस्वारांच्या दमावर मोंगल सुभेदाराच्या फौजा धाब्यावर बसवून वाटेल तें केलें. परंतु आतां त्याचा बोल-

चाला संपण्याचे दिवस जवळ येत चालले होते त्यानें दक्षिणेंत माजविलेली बंडाळी मोडावयाची तर स्वत· तिकडे गेल्याखेरीज परिणाम नाहीं, असें शहाजहानाच्या लक्ष्यात आलें, आणि तो पन्नासपाऊणशें हजार सेना सज्ज करून स.१६३६ च्या फेब्रुवारींत दक्षिणेंत उतरला तो दौलताबादेस येऊन राहिला. गेल्या दहा बारा वर्षांत ही त्याची दक्षिण देशीं येण्याची तिसरी खेप ! पहिल्या खेपेस स. १६२५ त तो बापावर रुसून बड करून दक्षिणेंत आला होता, तेव्हा मलिकंबरानें त्यास आश्रय दिला होता. त्या वेळीं शहाजी त्याचा स्नेही व अभिमानी पुरस्कर्ता होता पुढच्या दोन तीन वर्षांत तोच शहाजहान बादशाहीचें पद पावला आणि लोदीचें बंड मोडण्यासाठी दक्षिणेंत आला तेव्हां मागच्या खेपेचा स्नेही शहाजी त्या वेळीं बंडखोर लोदीचा कैवार घेऊन त्याचा कट्टा द्वेष्टा बनला होता, आणि आतां या तिसऱ्या खेपेला तर शहाजीचा उपद्व्याप डोईजड झाल्यामुळें त्याला मुद्दाम दक्षिणेंत यावें लागलें !

तो बादशहा दक्षिणेत मोहिमा चालविण्यांत वाकब होता, व हल्लीं त्यास कर्तव्य असलेली सर्व मसलत एकदम आटोक्यांत आणण्याजोगी साधनसंपत्ति त्याला अनुकूल होती आपल्या मुलुखातून शहाजीला हुसकून लावून जेरीस आणण्याचें काम त्यास प्रथम करावयाचें होतें. त्या कामाकरिता त्यानें दोन स्वतंत्र फौजा तयार केल्या व एकीवर खानजमान यास मुख्य नेमून ती शहाजीच्या पाठीस लाविली. दुसरी आठ हजार स्वारांची फौज शाइस्तेखानाबरोबर देऊन त्यास संगमनेर, जुन्नर, नाशिक, त्रिंबक घेण्याचा हुकूम केला. शहाजीच्या साऱ्या उड्या विजापुरकरांच्या जिवावर असल्यामुळें त्यांचीहि खोड चांगलीच मोडिली पाहिजे असें समजून त्यानें त्याच वेळीं आणखी एक भली मोठी फौज खान डौरान याजबरोबर विजापुरावर पाठविली

खान डौरान निघाला तो वाटेंत भोसल्याच्या मूळ वस्तीचीं चांभारगोंदें वगैरे गावें लागलीं तीं लुटून शहाजीस गाठण्याकरिता चालला, तों पारगावाजवळ त्याची गाठ पडली. शहाजीनें त्यास दोन तीन महिने हुलकावण्या दाखविल्या. परंतु विजापुरकर मोंगलाशीं तह करीत असल्याची वार्ता यास त्या च वेळीं कळली, तिकडून मोकळे झालेल्या मोंगलांचा जो जो सुळसुळाट वाढत जाणार तों तों परत जाण्याच्या आपल्या वाटा बंद पडणार असें पाहून तो पश्चिमेकडे वळला. खानजमान त्याच्या पाठीस रात्रंदिवस लागला होता त्यानें त्यास भीमापार पुण्यापर्यंत चालवीत नेलें. नंतर शहाजी लोहगडच्या माचीस जाऊन बसला व तिकडे जाण्याच्या वाटा त्यानें बंद केल्या. तेव्हा खानजमान अहमदनगरास परत गेला व शहाजी पुन· पुढें सरकून पुण्याजवळ येऊन राहिला.

पदा औ न

शहाजीचा मुलगा संभाजी संगमनेर परगण्यांत तळ देऊन राहिला होता त्यावर स १६३६ च्या मार्च महिन्यांत शाइस्तेखानानें स्वारी करून त्यास त्या परगण्यातून हुसकून लाविलें. तेव्हा सभाजी नाशिकाकडे पळून गेला. संगमनेरास ठाणें बसवून शाइस्तेखानहि संभाजीच्या पाठोपाठ नाशिकास गेला; तेव्हां तो नाशिक सोडून घाटाखालीं कोळवणांत पळून गेला शाइस्तेखान नाशिकास ठाणें बसवून तेथेंच राहिला तों सभाजी दुसऱ्याच घाटानें वर येऊन अहमदनगरपर्यंत जाऊन लुटालूट करू लागला। तेव्हां शाइस्तेखानानें नाशिक सोडून अहमदनगरच्या बचावाकरितां तिकडे कूच केले जातांना १५०० लोकांची एक टोळी जुन्नर घेण्यासाठीं त्यानें पाठविली होती. खान अहमदनगरास पोंचणार तों सभाजी तो टापू सोडून पुन्हा सगमनेरास आला'

जुन्नरावर मोंगल फौज येतेसें पाहतांच शिवनेरीस जिजाऊ होती ती आपला पुत्र शिवाजी यास बरोबर घेऊन घाट उतरून खाली कोंकणात माहुलीच्या किल्ल्यास गेली नवीन सुलतान जुन्नरांत रहात होता तोहि तिजबरोबर तिकडेच गेला मागून मोंगल आले त्यांनी जुन्नरचें ठाणें घेतलें ती बातमी संगमनेर मुक्कामीं संभाजीस कळताच तो जुन्नरास धांवून आला तो आपल्या कुटुंबाचीं माणसें व सुलतान यांच्या बचावाकरितां आला होता. पण ती मडळी आगाऊच निसटून माहुलीस गेली होती, हें वर सांगितलेंच आहे. तो येताच मोगलांनीं गांवाबाहेर येऊन लढाई दिली. त्या लढाईत त्यानें त्यांस मोडून गांवात पिटून घातलें व सभोंवती घेरा देऊन त्यांस घाबरें केलें तें वर्तमान शाइस्तेखानास कळतांच तो स्वतः आपली सर्व फौज घेऊन मे महिन्यांत जुन्नरास आला व त्यानें सभाजीस भीमेपलीकडे हुसकून लाविलें. जुन्नरांत त्याचें ठाणें बसलें होतें तरी जवळ तोफा वगैरे नसल्यानें शिवनेरीवर त्याचा इलाज चालण्याजोगा नव्हता. सबब किल्ला घेण्याच्या भानगडींत न पडतां जुन्नरचा भक्कम बदोबस्त करून तो दौलताबादेस बादशहाच्या भेटीकरितां गेला.

विजापूरकराच्या हद्दींत खान डौरान शिरला तेव्हां प्रथम त्याचा रोख राजधानीवर चालून येण्याचा होता, पण विजापुराभोंवतालच्या दहापांच मैलांचा टापू महमद अदिलशहानें ओसाड करितांच तिकडे जाण्याचें वर्ज्य करून तो मोकळा मुलूख लुटूं लागला त्यावर विजापुरचा रणदुल्लाखान चालून आला. तेव्हां लढाया झाल्या त्यांत केव्हां रणदुल्लाची तर केव्हां मोंगलांची सरशी होत होती. मोहिमेचा हंगाम महिना दोन महिनेच उरला होता. पुढें पावसाळ्यामुळें लढाई बंद पडावयाचीच होती लढाईमुळें विजापुरकरांचें अजून म्हणण्याजोगें नुकसान कांहींच झालें नव्हतें. असें असतां मे महिन्यात विजापुरकरांनी मोंगलांशीं अकस्मात् समेट करून तह ठरवून

घेतला ! मुसलमान इतिहासकार मोंगल पक्षाची बढाई मिरविण्यासाठीं विजापुरवाले टेंकीस आले, त्यांचा निरुपाय झाला, असा मतलबीपणाचा मजकूर लिहितात; त्यावरून ग्रँट डफ् वगैरे इंग्रज इतिहासकारहि तसेंच लिहितात. पण त्यांस हा इतिहास कांहींच कळला नाहीं असें म्हणावें लागतें ! विजापुरवाले तहास कबूल झाले त्यांतलें इंगित काय व तसा तह केल्यामुळें त्याचा काय फायदा झाला हें आतां स्पष्ट करितों.

महमद अदिलशहा आतां वयांत येत चालल्यामुळें त्याचें त्यास कळूं लागलें होतें. शहाजीचे पुरस्कर्ते खवासखान व मुरारपंत यांस बाजूस ठेवून नवीन मंत्र्याच्या साह्याय्यानें तो राज्यकारभार पाहूं लागला होता. शहाजहान जसा मोठा सेनापति होता तसाच तो चतुर मुत्सद्दीहि होता. शहाजीनें उठविलेली बावटळ सामदानादि उपाय योजून त्यास हरप्रयत्नानें शांत करावयाची होती त्यानें त्या तरुण सुलतानाशीं बोलणें घातलें की, तूं शहाजीस सोडून समेटास कबूल होत असशील तर निजामशाही राज्य आपण आप-आपसात वाटून घेऊ. तीन हिस्से माझे आणि दोन हिस्से तुझे याप्रमाणे वांटणी करू. सुलतान महमद अदिलशहास तो विचार मानवला लौकिकापेक्षा लोभाचा पगडा त्याच्या मनावर अधिक बसला. त्यानें विचार पाहिला कीं, अनायासें एवढा लाभ होत असता शहाजीशीं सख्य राखून मोंगलाशीं बिघाड चालू ठेवावा आणि खराबी करून घ्यावी यात स्वार्थ नाहीं. शहाजी पुढें जें देणार त्यापेक्षां तिप्पट चौपट फायदा अनायासें आजच होतो आणि लढाईचें संकट टळतें, तर मोंगल म्हणतो त्याप्रमाणें समेट करणें हाच उत्तम पक्ष आतां असें केल्यानें शहाजीस दगा दिल्याचें अपेश येतें हें खरें, पण त्यावर तमाच निकराचा प्रसंग येईल तेव्हां त्यास आपल्या राज्यांत जहागीर देऊन त्याचें समाधान करिता येईल. निजामशाहींतली त्याची मूळची जहागीर पंधरावीस लाखांची आहे तितकी त्यास दिली म्हणजे त्याचें नुकसान भरून निघेल कीं नाहीं ? तात्पर्य, वडे लोक स्वार्थाचा विचार पाहूं लागले म्हणजे संगतीस असलेल्या दुर्बळाचें नफानुकसान हिशेबांत धरीत नसतात, हा नेहमींचा अनुभव आहे व तोच प्रकार येथें दृष्टोत्पत्तीस आला.

मग मोंगल व विजापुरकर यांमध्यें मे महिन्यांत तह झाला. त्या तहांत निजामशाही राज्यापैकीं ८० लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख विजापुरकरांस मिळाला. शहाजीसंबंधें पुढें काय करावयाचें याबद्दलची योजना विजापुरच्या सुलतानानें मोंगल, बादशहास कळविली होती. तिला संमति देतांना त्यानें इतकेंच ठरवून घेतलें होतें कीं, शहाजीस जहागीर द्यावयाची ती दक्षिणेतली न देता कर्नाटकातली देण्यांत यावी या तहासंबधें एवढीच गोष्ट या चरित्राच्या वाचकानीं ध्यानांत ठेवावयाची आहे कीं, पुणें, सुपे, इंदापूर, बारामती, चाकण हे शहाजीच्या जहागिरीचे परगणे व दाभोळपासून वसईपर्यंतचा सर्व कोंकण प्रांत विजापुरकराच्या वांटणींत आला.

विजापुरकरांनीं तह केल्याचें ऐकून शहाजीचें मन चिंताक्रांत झालें. आतां मोंगल व विजापुरकर हे दोघेहि एक होऊन आपला पिच्छा पुरविणार त्या अर्थी निजामशाहीची उभारणी करण्याचा आपला मनोरथ सिद्धीस जात नाहीं हें त्यास कळून चुकलें. इतकी जिवापाड मेहनत करून आजपर्यंत सभाळलेले कारस्थान शेवटीं सोबत्यांच्या विश्वासघातामुळें ढांसळणार हें पाहून त्यास फार वाईट वाटलें. तथापि जेथपर्यंत आपला इलाज चालेल तेथपर्यंत प्रयत्न करीत रहावयाचें, हा त्याचा निश्चय ढळला नाहीं. या वेळीं तो मोंगलांस शरण जाता तर त्याचा कांहीं तरी फायदा झाला असता. निदान पुढें होणारी जिवाची तारांबळ तरी चुकली असती. परंतु स्वार्थापेक्षा अगर सुखापेक्षा त्याला अब्रूची चाड विशेष वाटत असल्यामुळें तो विचार त्याच्या मनांत आला नाहीं! देशावरचा त्याचा सर्व मुलूख आता मोंगलांच्या हातीं गेलाच होता पण अजून नामांकित सहा किल्ले व सात आठ हजार विश्वासू फौज त्याच्या ताब्यात होती. तेवढ्याच बळावर त्यानें लढाई चालू ठेविली.

खानजमान अहमदनगरास गेला होता. तेथून तो जूनच्या प्रारंभीं शिवनेरी घेण्याकरितां जुन्नरास आला. नवीन तहाप्रमाणें शहाजीच्या पारिपत्याकरिता विजापुराहून रणदुल्लाखानाची फौजसह रवानगी झाली होती व त्याप्रमाणें तोंही मोंगलाच्या लष्करास येऊन मिळाला होता. जुन्नरास आल्यावर शिवनेरी आपल्या हातीं येण्याजोगी नाहीं. ही शाइस्तेखानाप्रमाणें खानजमान याचीहि खात्री झाली. सबब त्या किल्ल्यास शह देण्यापुरते दोन हजार लोक तेथें ठेवून, शहाजी पुण्यास येऊन राहिला होता तिकडे जून महिन्याच्या अखेरीस खानजमान निघाला. वाटेंत पावसाची झोड उठल्यामुळें घोडनदीवर एक महिना मुक्काम करून त्यास रहावें लागलें. त्या मुदतींत रणदुल्लाखानानें किल्ले हवाली करून विजापुरास आपणाबरोबर येण्याविषयीं शहाजीशीं बोलणें लाविलें. परंतु तो तें ऐकत नाहीं व पाऊसही थांबला असें पाहून खानजमान लोहगांवापर्यंत पुढें चालून आला. तें पाहतांच शहाजी पुणें सोडून कोंडाणा व तोरणा यांच्या दरम्यान डोंगराळ प्रदेश आहे तेथें जाऊन राहिला, तिकडे त्यावर चालून जाण्याचा कांहीं उपयोग नाहींसें समजून खानजमान यानें बोरघाटाकडे चाल केली, व तो घाट उतरून फौजेच्या लहानसहान टोळ्या करून कोंकणचा मुलूख लुटूं लागला. तों शहाजी दुसऱ्याच एका घाटानें खालीं उतरून चोंहोंकडे पांगलेल्या मोंगलांस झोडपीत सुटला. पण खानजमान सर्व फौज गोळा करून लढाई देण्यासाठीं त्यावर चालून आला, तेव्हां तो निसटून पुन्हा घाट चढून आला. मागून खानजमान आपल्या पाठीस लागून घाटावर येईल असें त्यास वाटत होतें. परंतु तसें न घडतां खानमजकूर उत्तर कोंकणातले किल्ले काबीज करण्याच्या उद्योगास लागला. माहुलीवर शहाजीचें कुटुंब व नवीन सुलतान रहात होती. तिकडे वळण्याचा शत्रूचा रोख दिसून येतांच त्या किल्ल्याच्या संरक्षणार्थ शहाजीस धांवून जावें लागलें. तो कोंकणांत

आल्याची बातमी राखून खानजमान यानें त्यास गाठण्याकरितां खूप लगट केली पावसाची सतत धार व मागून शत्रूची निकड अशी स्थिति झाल्यामुळें शेवटच्या मुक्कामीं बुनगे व लष्करचा सरंजाम तसाच टाकून शहाजीनें माहुली गाठली व किल्ला लढविण्याची तयारी केली तों मोंगलानीं येऊन किल्यास घेरा दिला.

नतर कांहीं दिवसपर्यंत शहाजीनें मोठ्या मर्दुमीनें किल्ला झुजविला. अखेर किल्ल्याच्या मार्चास धान्याची कोठारें होतीं ती मोंगलांनीं घेऊन लुटलीं. तेव्हां उपास-मार होण्याची पाळी येऊन त्याचा उपाय खुटला. मोंगलांच्या लष्करात विजापुरकरांचा सरदार रणदुल्लाखान फौजेसह होता तो लढ करण्याविषयीं शहाजीस वारंवार सांगतच होता. त्याच्याच मार्फतीनें खानजमानाशीं शहाजीनें बोलणें सुरू केलें. शहाजीनें विजापुरास सुलतानाच्या भेटीस जावें व सुलतानानें त्यास आपल्या राज्यांत जहागीर द्यावी हें सर्व पूर्वी ठरलेंच होतें परंतु नवीन सुलतान व सहा किल्ल्यांच्या सोडचिठ्या हातीं आल्याखेरीज खानजमान त्यास जाग्यावरून हालू देईना. शेवटीं किल्ल्याच्या सोडचिठ्या व सुलतान मूर्तिजा निजामशहा तिसरा स १६३६ च्या आक्टोबरात मोंगलांच्या हवालीं करून शहाजी या संकटातून मुक्त झाला. त्या नवीन सुलतानास शहाजीनें मोंगलांच्या हातीं आपण होऊन दिलें नाहीं, मोंगलानीं किल्ले घेतले त्यातल्या एकांत तो त्याम सापडला, असे डफ लिहितो तें काफीखानाच्या इतिहासावरून लिहितोसें दिसतें. परंतु आमच्या लिहिण्यास आधार प्रो. सरकार यांचा ग्रंथ व मुख्यत' जेधे शकावली हे होत.

निजामशाही राज्याचा शेवटचा वाली शहाजी यानें त्या राज्याच्या बचावाकरितां जो शेवटपर्यंत उत्तमोत्तम प्रयत्न केला त्यामुळें दुनियेंत त्याची मोठी वाहवा होऊन निजाम-शाही रयतेची त्यावर मोठी प्रीति बसली त्या प्रीतीचा उपयोग पुढें शिवाजीस कसा झाला हें विवेचन पुढें येईल त्यानें स्थापिलेला नवीन सुलतान जन्मापासून कारागृहांतच होता. मध्यंतरीं तीन वर्षें राज्यवैभव भोगावें असा त्याचा प्रारब्धयोग होता तो योग सप-तांच त्यास पुन्हां कारागृह प्राप्त झालें ' वर शहाजीनें सहा किल्ल्याच्या सोडचिठ्या दिल्या म्हणून लिहिलें ते किल्ले सिंहगड, पुरंदर, लोहगड, माहुली, शिवनेरी, व त्रिंबक हे होत. त्यांपैकीं पहिले चार विजापुरकरांच्या व शेवटचे दोन मोंगलांच्या वांटणीत समाविष्ट झाले

नतर शहाजी माहुलीहून निघाला तेव्हां त्याबरोबर जिजाऊ, मभाजी व शिवाजी अशीं कुटुंबाचीं माणसें असून फौज व सरंजाम जुजबीच होता. जिजाऊ व शिवाजी यांस पुण्यास अथवा बहुधा सिंहगडास ठेवून संभाजीस मात्र बरोबर घेऊन तो विजापुरास गेला. इतक्याही लहान वयांत संभाजी लष्करी कारभारात बापाच्या उपयोगीं पडण्या-सारखा झाला होता, हें मागें आलेल्या मजकुरावरून दिसून येईलच.

शहाजीचे चुलत भाऊ मालोजी व परसोजी व खेळोजी हे मोंगलाकडे चाकरीस राहिले होते म्हणून मागें सांगितलें आहे त्या भावापैकीं खेळोजीचा शेवट कसा झाला हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. त्या खेळोजीस मागल फौजेंत पाच हजार स्वारांची 'मनसब मिळाली होती व तिकडे राहून त्यानें मोठमोठे पराक्रम केले होते स. १६३३ त मोंगलांच्या हातीं दौलताबाद लागण्याचे सुमारास खेळोजी मोंगलास सोडून विजापुरकरांचे चाकरीस राहिला व त्याच्या तर्फेनें वारवार मोंगलाशीं लढला. घरी त्याची बायको होती ती एकदा गोदावरीस स्नानास जात असता त्या प्रांताच्या मोंगल सरदारानें तीस पकडले आणि खेळोजीस सांगून पाठविलें कीं, जर तू मला चार लक्ष रुपये देशील तर तुझ्या बायकोला पातिव्रत्यापासून भ्रष्ट न करितां मी सोडून देईन. त्याप्रमाणें खेळोजीनें ती रकम देऊन बायको सोडविली परंतु एवढा जबर भुर्दंड पडल्यामुळें तो नातवानीस आला पुढें शहाजहान व विजापुरकर याचा तह ठरल्याबरोबर विजापुरकरानीं खेळोजीस नोकरींतून काढलें. बेकार झाल्यामुळे खेळोजी दौलताबादेजवळ आपल्या वडिलार्जित जाग्यास आला आणि लुटालूट करून पोट भरू लागला. औरंगजेबास ती बातमी कळताच त्यानें मलिक हुसेन याजबरोबर खेळोजीचें बंड मोडण्याकरिता फौज पाठविली. तिनें त्यास गाठून मारून टाकिलें. हीं गोष्ट आक्टोबर १६३९ च्या सुमारास घडली.

शहाजी विजापुरास गेला तेव्हा माहुलीपासूनच रणदुल्लाखान त्याजबरोबर होता व त्यानेंच त्याची व सुलतानाची भेट करून दिली. दरबारांत भेटीच्या वेळीं शहाजीचा नूर एखाद्या नोकरी मागण्यास आलेल्या अर्जदाराप्रमाणें दिसत नव्हता त्याजवर मोर्चेलें उडत होतीं। कमी अधिक ऐश्वर्याचे दोन राजे परस्परांस भेटतात त्याप्रमाणें या भेटीचा समारंभ झाला. ( शिवदिग्विजय पृ. ४०६ ) यापुढेंही तो विजापूर दरबाराशीं अशाच तऱ्हेनें आपलें महत्व राखून वागत असे व तें दरबारहि त्याची योग्यता ओळखून त्यास गौरवानें वागवी. यापुढे वर्ष सहा महिने मुरारपत नवीन मिळालेल्या मुलखात लावणीमनणी करण्यात गुतला होता, त्यास शहाजी मदत करीत होता, असें डफ म्हणतो तें प्रत्यतर पुराव्याखेरीज खरें मानवत नाहीं. कारण, शहाजी देशी असेपर्यंत निजामशाहीत मोंगलांचा अमल बसणें दुर्घटच होतें बहुधा कोणच्या तरी स्वारीच्या निमित्तानें निदान त्या वर्षीं तरी त्यास कर्नाटकाकडे घालवून देण्यांत आलें असावें. स. १६३८।३९ त जिजाऊ शहाजीस भेटण्यास गेली तेव्हा तो बेंगरुळास होता असें सभासद व चित्रगुप्त लिहितात तेंहि अनुमानधबकयाचे लिहिणें दिसते शहाजीची बेंगरूळ ही राहण्याची मुख्य जागा बरींच वर्षे केली होती हें खरें. पण स. १६३८त तो बेंगरुळास राहत असेल हें संभवत नाहीं. त्याची जहागीर शिवदिग्विजय पृ. ५२ वर दिली आहे ती गोळाबेरजेनें खरी दिसते. परंतु अमुक सालचीं अमुक जहागीर हा निर्णय त्यावरून होत

नाहीं. बहुधा या पुढच्या दहापाच वर्षें तुंगभद्रेच्या काठचे अनागोंदी, कनकगिरी, कंपली, सावनूर, हावनूर वगैरे टापू शहाजीच्या जहागिरींत लावून दिलेले असावे.

स. १६३७ च्या पुढचें शहाजीचें चरित्र जुळविण्याचीं साधनें फारच थोडीं आहेत व त्यांचा विचार येथें कर्तव्यहि नाहीं. इतका वेळ झालेले विवेचन हा त्याच्या चरित्राचा पूर्वार्ध होय व तेवढ्याचीच चर्चा या चरित्रांत करावयाची होती ती आता झाली आहे. शहाजीच्या कृत्यांचें वर्णन बखरींतून काहींच मिळत नाहीं. मुसलमानी इतिहासांतून मात्र थोडें बहुत लिहिलेलें सांपडतें. तें लिहिणें काहींसें एकतर्फी असणा-रच, तथापि विवेचकबुद्धीनें त्याचे एकत्र सकलन करून हें चरित्र वाचकास सादर केलें आहे. आता शेवटीं शिवाजीच्या चरित्रातले विविध प्रसंग उद्भवण्यास हें शहाजीचें चरित्र कसें कारणीभूत झालें याबद्दल दोन शब्द लिहून हा लेख पूर्ण करू.

विजापुरकराच्या चाकरींत शिरल्यानंतर पहिल्या तीनचार वर्षांत शहा-जीच्या मनोवृत्तींत जो क्षोभ उत्पन्न झाला त्यातच शिवाजीच्या राज्यस्थाप-नेचें बीज आहे. राज्यसंस्थापकाच्या पदवीस पोंचलेल्या शहाजीस हें परमुलखांत सेवावृत्तीचे लाजिरवाणे जिणें पतकरणें कशामुळें प्राप्त झाले ? मोंगलाच्या नावानें तो जळत होताच. पण विजापुरकरानीं आयत्या वेळीं आपणास दगा देऊन स्वतःचा स्वार्थ साधून घेतला याबद्दल त्याचें मन फार दुखावले होतें "महमद अदिल-शहानें विश्वासघात करून माझें राज्य बुडविलें आणि जहागीर दिल्याचा उपकार दाखवून मला हद्दपारीची शिक्षा भोगावयास लाविलें. ज्याच्या माडीस माडी लावून बसण्याची योग्यता आपण संपादन केली होती त्याचीच आता ताबेदारी सोसावी, चाकरी करावी, मर्जी धरावी, असे दिवस आपणास प्राप्त झाले ! आणि इतकें असून याबद्दल तोंडांतून अक्षरहि काढण्याची सोय नाहीं, हा गुपित मारा निमुटपणें यावज्जीव सोसलाच पाहिजे," असे विचार उद्भवून त्याच्या मनास फार खेद वाटे ! "ज्यानीं हें सर्व केलें, त्या शत्रूंवर अगर हितशत्रूवर सूड उगविण्याच्या सधी आता माझ्या आयुष्यांतून निघून गेल्या. तर मग या अपमानाचें परिमार्जन कुणीं करावें ? हें उसनें कोणी फेडावें ?" असें जेव्हां जेव्हा त्याच्या मनात येई तेव्हां तेव्हां शिवाजीची आठ वर्षांच-छोटी मूर्ति त्याच्या डोळ्यासमोर उभी राही । करील तर हें सर्व माझा शिवाजीच करील, असें त्यास वारंवार वाटे हा त्याचा अदाज पुढें किती पूर्णपणें खरा ठरला ! शहाजी हा महाप्रतापी, महाकारस्थानी पुरुष — हा राज्यक्रांति करणारा चळवळ्या — दक्षिणेंत राहूं दिला तर आपलीं राज्यें नांदूं देणार नाहीं असें मानून दिल्लीचा शहाजा-हान व विजापुरचा महमद यानी शहाजीस कर्नाटकात डांबून घातलें व पुन्हां त्यानें दक्षिणेंत येऊं नये असा बंदोबस्त केला. पण पुढें लवकरच बापाहूनसुद्धां पराक्रमानें अधिक देदीप्यमान शिवाजी आपल्या राज्यावर एकाहून एक भयंकर तडाके लगावील हें मोंगल व विजापुरकर या दोघांच्याहि स्वप्नातसुद्धा त्या वेळी आले नाहीं ।

शिवाजीनें निराळें राहून स्वतंत्र राज्य करावें, ही कल्पना शहाजीला सुचली खरी, पण तो अशा विकट परिस्थितींत सांपडला होता कीं, ती अमलांत आणितांना फार सावधपणानें वागणें त्यास प्राप्त होतें. शिवाजीचा जन्म झाल्या दिवसापासून शहाजीचा सर्व काळ लढायाच्या धामधुमींत गेल्यामुळें मुलाचा सहवास त्याला फारच थोडा लाभला होता. मुलगा मोठा होऊं लागला तसतशी त्याची बालचर्या पाहून आपला बेत पक्का करणें त्यास जरूर होतें. त्यासाठीं त्यानें स. १६३८।३९ त व पुढें १६४१ त शिवाजीस आपणाकडे बोलावून जवळ ठेऊन घेऊन परीक्षा पाहिली. त्यांत शिवाजीचें उदयोन्मुख अपूर्व तेज त्याच्या चांगलेंच दृष्टोत्पत्तीस आलें. मग त्यानें आपल्या कारभारीमंडळाशीं खलबत करून पुढें योजलेला बेत पार पाडण्यासाठीं एव्हांपासून एक एक पाऊल धीरे धीरे कसें टाकावयाचें हा निश्चय ठरविला. नंतर जिजाऊ आपणास आवडत नाहीं, शिवाजी आपल्या मर्जीबाहेर वागणार, सबब जवळ ठेवण्याच्या सोयीचा नाहीं, असें खोटेंच निमित्त ठेवून त्या दोघांसहि आपणापासून दूर पुण्यास ठेवण्याची मसलत योजिली आणि त्यांस विश्वासू दिवाण दादाजी कोंडदेव याजबरोबर पुण्यास रहावयास पाठविलें, आणि त्याबरोबरच आपलें कारभारीमंडळहि कोणच्या ना कोणच्या तरी निमित्तानें तिकडेंच रवाना केलें

यावर कोणी अशी शंका घेईल कीं, शिवाजीनें स्वराज्याची स्थापना केली ती शहाजीच्याच प्रेरणेवरून केली असें तुम्ही सांगतां, पण बखरींत किंवा तवारिखांत याबद्दल उल्लेख नाहीं अथवा त्या अभिप्रायाचा शहाजीचा लेखहि कोठें मिळालेला नाहीं. मग तुम्ही म्हणतां हें खरें कशावरून? या शंकेला उत्तर एवढेंच कीं, शहाजी मोंगलाचा प्रतिद्वंद्वी होता तोंपर्यंत तवारिखवाल्यांनीं त्याचा थोडा बहुत परामर्ष घेतला. बाकी गोष्टींबद्दल खोल पाण्यांत शिरून शोध घेण्याचें त्यां तिन्हाइतांना काय कारण? बखरी लिहिणारांनी याबद्दल कांहीं लिहावयाचें, पण त्यांची शहाजीबद्दलची माहिती किती कोती व अव्यवस्थित आहे हें पूर्वी सुचविलेंच आहे. आतां शहाजीच्या लेखा-विषयीं पाहिलें तर, ज्याच्या ताबेदारींत त्याला रहावयाचें, त्यांच्याच राज्यावर तूं घाले घालीत जा, असें तो शिवाजीला पत्र लिहून कसें कळवील? असलीं धोक्याचीं व गूढ कारस्थानें हे मुळीं पांढऱ्यावर काळें करण्याचे विषयच नव्हत अत्यंत विश्वासू माणसाबरोबर निरोपानिरोपी या गोष्टी चालावयाच्या. तेव्हां या बाबतींत शहाजीच्या लेखाची अपेक्षा करणें वेडेपणाचें होय.

पण एवढ्यावरून आम्ही म्हणतों याला काहींच आधार नाहीं असें मात्र कोणी समजूं नये. आमचें विधान सिद्ध करण्यास वाचकांची खात्री होण्याजोगे पुष्कळ मुद्दे आम्हांस दाखवितां येतील. ते मुद्दे असे—जिजाऊ व शिवाजी यांबरोबर शहाजीनें पुण्यास पाठविलें हें योग्यच झालें, पण दादाजी कोंडदेवास जहागीर संभाळण्याकरिता पुण्यास पाठविलें हें योग्यच झालें, पण

यावरोबर शामराव निळकंठ पेशवे, बाळकृष्णपंत मुजुमदार, सोनोपत डबीर, व रघुनाथ बल्लाळ सबनीस हे चार इसम जे शहाजीनें पुण्यास पाठविले ते कशाकरिता ? जिथें गादीची जागा असते, जिथें राज्याचा कारभार चालतो, तिथें पेशवे, मुजुमदार, डबीर, सबनीस इत्यादि अधिकारी लागतात. पुणें परगण्याच्या शेंपन्नास खेड्याचा कारभार आंवरायला दादाजीसारखा महालकरी बस्स होता. त्याला पेशवे, मुजुमदार कशाला पाहिजेत ? शहाजीच्या अनेक संकटकाळीं उपयोगीं पडलेले, मुलकी व लष्करी कामा-तले वाकबगार, शत्रूचे किल्ले व ठाणीं फितुरानें किंवा हल्ल्यानें घेण्यांत तरबेज असलेले असे हे मलिकंबराच्या वेळेपासूनचे शहाजीचे विश्वासू कारभारी-यानीं पुण्यास राहून काय करावयाचें होतें ? जिथें शेतीभाती करावयाची असते तिथें हत्ती कशाकरिता लागतात ? हे कारभारी लोक पुण्यास नेहमीं राहण्याकरितां पाठविण्यांत राज्यस्थापनेखेरीज शहाजीचा दुसरा कांहीं हेतु दिसत नाहीं

शिवाजी दहा वर्षांचा होता त्या वेळचा म्हणजे स. १६४० तला त्याचा शिक्का आहे तो असा·—

> प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥
> शाहसूनो· शिवस्यैषा मुद्रा भाति यशस्विनी ॥

शिक्क्यातले शब्द गंभीरार्थपूर्ण आहेतच, पण इतर प्रकारांमुळें सुद्धा हा शिक्का चमत्कारिक आहे. शिक्क्यांत देवाचे तरी नाव असावें, नाहींतर राजाचें तरी असावें. इथें दोन्हीं नाहींत ! दुसरी गोष्ट अशी कीं; बापाच्या हयातींत निराळा अधिकार मिळाला असल्याखेरीज मुलानें निराळा शिक्का करण्याचें प्रयोजनच नाहीं. बापाच्या शिक्क्याव-रच मुलानें सरकारी काम भागवावयाचें असा. तें शहाजीपेक्षा शिवाजीला निराळा अधिकार कोणचा चालवावयाचा होता ? असला हा स्फूर्तिजनक चमत्कारिक शिक्का कल्पून तो सरकारी कागदपत्रावर करण्याची कल्पना दहा वर्षांच्या मुलाला आपण होऊन सुचली असें तर कोणाचें म्हणणें नाहीं ना? हा नवीन शिक्का शिवाजी करीत असतो, व त्याचे कारकून स्वतःस पेशवे, मुजुमदार, डबीर म्हणवीत असतात, ही गोष्ट शहाजीला मुळींच ठाऊक नसेल असेंहि संभवत नाही. तर मग हा शिक्का चालू करणारे लोक कोण? शहाजीच्या गर्भित संमतीखेरीज शिवाजीच्या दरबारात असला नवीन शिक्का कसा सुरू होऊ शकेल?

स. १६३८ च्या अखेरीस शिवाजी बेंगरुळाहून पुण्यास आला. येतांच त्यानें 'बारा मावळें' काबीज केलीं, असें सभासदाच्या बखरींत लिहिलें आहे पण तेव्हां तर शिवाजी आठ वर्षांचा होता आठ वर्षांच्या मुलानें हीं मावळें काबीज करावयाचीं कशीं ? अर्थात् त्याच्या नावावर हणमंते वगैरे कारभाऱ्यानीं ही मुलुखगिरी केली,

हें स्पष्ट आहे येतांच या बखरींतील पदावरून बेंगरूळास ठरलें होतें - त्याप्रमाणें
शिवाजीनें पुण्यास येतांच बारा मावळें काबीज केलीं असा ध्वनि निघतो. बेंगरुळाहून
येणें व मावळें काबीज करणें यातला कार्यकारणभाव आम्हाला तर स्पष्ट
दिसतो. चिटणिशी बखरींत तर (शिवाजी महाराज) शके १५६२ त या
व राज्यस्थापनेच्या ) मसलतीचा आरंभ करिते झाले ' असें स्पष्टच म्हटलें आहे.
श. १५६२ त शिवाजीस बारावें वर्ष लागलें होतें. शहाजीला कळविल्याखेरीज
मसलतीचा प्रारंभ शिवाजीच्या कारभाऱ्यांनीं आपल्याच जबाबदारीवर केला हें
कसें घडेल ?

शिवाजीच्या बंडाला मूळ कारण शहाजी आहे याबद्दल खात्रीलायख पुरावा
मिळाला असल्याखेरीज विजापुरचा सुलतान, शहाजीसारख्या असामान्य महत्त्वाच्या
प्रधान पुरुषाची केवळ संशयावरून हुरमत घेऊन त्यास ठार मारण्यास तयार होईल
हें संभवत नाही त्या अरिष्टातून मुक्त होताच खरें पाहिलें तर, पुन्हां असा पुंडावा
करून माझ्या जिवावर संकट आणूं नकोस अशी शहाजीनें शिवाजीला ताकीद द्यावी.
पण तसें न करितां उलट तो कान्होजी नाईक जेध्यापासून आणभाक घेतो कीं,
" चिरंजीव राजश्री सिउबा खेडेबारीयात व पुणा आहेत त्यांजवळ तुम्ही जमावानसी
राहावें तुमची जबरदस्ती त्यां प्रांतें आहे अवघे मावळचे देशमुख देखील त्यासी रुजू
होऊन त्याचे आज्ञेत वर्तेत येसा विचार करून जबरदस्तीने राहावें येखादी मोगलाईकडील
फौज व ईदिलशाही कडील फौज आली तरी आपण इमान राखावें. त्यासी लढाई
करावी येसी शफत इमानपुरस्कर बेलरोटीवर हात ठेऊन घेतली " ( भा. इ. सं.
मंडळ चतुर्थ संमेलनवृत्त पृ. १७९ । ८० ) शिवाजी आपल्या मनोदयाप्रमाणें वागत
आहे असें वाटत असल्याखेरीज शहाजीच्या हातून असें वर्तन कसें घडेल !

' स १६४० पासून जिजाऊ व शिवाजी यांवर शहाजीची इतराजी होऊन त्यांचें तोंड-
सुद्धां पहावयाचें नाहीं असा त्यानें खरोखरच निश्चय केला होता असें जरी मानिलें, तरी
त्या दोघांवर संभाजीची नाराजी होण्यास कांहींच कारण नव्हतें. संभाजीची व जिजा-
ऊंची विजापुरास शेवटची भेट झाली त्यानंतर तो तेरा वर्षें जिवत होता त्या मुदतींत
जिजाऊनें आपल्या थोरल्या मुलास भेटण्याकरिता एकदांसुद्धां कर्नाटकाकडे जाऊं नये,
अगर आईला भेटण्याकरितां त्यानें एकदांसुद्धां पुण्यास येऊं नये, हें कसें घडलें ?
पुण्याच्या मंडळींनीं कर्नाटकाकडे बघूं नये आणि कर्नाटकवाल्यांनीं पुण्यास आपली कोणी
माणसें आहेत हें मुळीं अजीबात विसरून जावें, हा सारा शहाजीनें काहीं मतलबामुळें मुद्दाम
घडवून आणलेला प्रकार दिसतो. शिवाजीकडून पुंडावा करवायचा आणि आपण
नामानिराळें रहायचें, याखेरीज यांत त्याचा दुसरा मतलब दिसत नाहीं.

असो. रा. राजवाडे यांनीं आपल्या ४ थ्या खंडाच्या अत्यंत सुंदर प्रस्तावनेत या विषयावर बरेंच लिहिलें आहे आणि 'इतिहास व ऐतिहासिक' या मासिकाच्या अंक २८ वगैरेंत धुळ्याचे रा. भट यांनींहि विचारपूर्वक ऊहापोह केला आहे. तेव्हां येथें आतां ही चर्चा इतकीच पुरे.

मुलगा माझें ऐकत नाहीं हें बापाचें ढोंग साजरें दिसायला तो मुलगा वयानें कांहीं तरी मोठा व्हावा लागतो. त्याप्रमाणें शिवाजी सोळा वर्षांचा झाला न झाला तोंच त्यानें प्रथम विजापुरकरांचा तोरणा किल्ला घेतला, आणि तेथपासून त्याचे दंगेधोपे जे एक-सारखे सुरू झाले त्यांचें पर्यवसान मराठी स्वराज्याची स्थापना होण्यांत झालें, हें सर्वांस माहीतच आहे. इतक्या लहान वयात त्यानें राजसत्तेशीं विरोध करण्याचें साहस केलें म्हणजे बंड केलें. ही गोष्ट हल्लींच्या लोकास मोठी अजब वाटते. पण त्या काळाशीं तादात्म्य कल्पिलें असता कोणासहि दिसून येईल कीं, यांत अजब असें कांहींच नाहीं. असलीं बंडें त्या काळांत नेहमीं होत असत. कोणाचें साधे तर कोणाचें फसे. खुद्द भोसल्यांच्या कुळापुरतें पाहिलें तरी, मालोजीनें बंडाव्याचा प्रकार थोडासा केला होताच. मागून शहा-जीनें बंड केलें, खेळोजीनें केलें आणि आतां स. १६४६ त शिवाजीनें केलें! पन्नास वर्षांत एकाच घराण्यात चार बंडखोर। बंडावा केल्यामुळें मालोजीचा थोडासा फायदा झाला. शहाजीस फायदाहि झाला नाहीं आणि नुकसानेंहि झालें नाहीं, पण त्याचा लौकिक वाढला, खेळोजीनें प्राण गमावला आणि शिवाजीनें साम्राज्य कमावलें!

प्रथम प्रथम शिवाजीला बोभाटा न करितां व फारसें वर्दळीवर न येतां पुण्या-शेजारच्या प्रदेशात अंमल कसा बसवितां आला याची उपपत्ति लावताना त्या प्रदेशांत नुकतीच झालेली राज्यक्रांति लक्ष्यात घेतली पाहिजे. निजामशाही व इदिलशाही यांमध्यें नीरा नदीची सरहद्द होती. निरेपासून चाकणपर्यंतचा मुलूख निजामशाहीपैकीं असून तेथें शहाजीचा अमल होता व तो लोकप्रिय होता. अलीकडे झालेल्या वाटणींत हा मुलूख विजापुरकरांकडे गेला होता. तथापि त्यांचा तेथला बंदोबस्त ढिलाच होता. शहाजीचा अमल उठून पांचचार वर्षें होतात न होतात तोंच तेथील लोकांच्या काना-वर शिवाजीचें नांव वारवार येऊं लागलें. तो काय करितो व करणार इकडे सर्वांची कौतु-कपूर्ण दृष्टि वळली. या मुलाचें बरें व्हावें, याचा मनोदय सिद्धीस जावा, याला शक्य ती मदत करावी, इकडे लोकांच्या मनाची प्रवृत्ति होऊं लागली. निरेच्या अलीकडचा मुलूख शिवाजीला सहजासहजीं मिळविता आला याचें खरें कारण हेंच होय. सिंहगड, पुरंदर, तोरणा, लोहगड, राजमाची वगैरे मोठमोठे किल्ले या टापूंत आहेत. परंतु यांतला एकहि किल्ला घेण्यास शिवाजीला लढाई करावी लागली नाहीं. फारसा गाजावाजा न करिता किल्लेदारांकडे सखानें लावून तर कुठें लांच देऊन, कुठें धाक दाखवून तर कुठें फितूर करून, शिवाजीला हे किल्ले हाताखालीं घालता आले. या किल्ल्यावर

शहाजीच्या नेमणुकीचे पूर्वीचे गडकरी लोक होते तेच विजापुरकरांनीं कायम केले होते. त्यानीं शहाजीचे किल्ले वेळ आली तेव्हां शहाजीच्या मुलाला देऊन टाकले! कोंकणचा मुलूख निजामशाहीपैकीं होता तो सर करितांना शिवाजीला पुष्कळदां वडिलांची पुण्याई अशीच उपयोगीं पडली. आबाजी सोनदेव यानें कल्याणावर स्वारी केली तो एकदोन महिन्यांत तो सुभा काबीज करून परत आला सुद्धां! सुभा म्हटला म्हणजे त्याची मुख्य जागा वरीच बंदोबस्ताची व बळकट असते त्या सुभ्यांत किल्ले आणि ठाणीं असतात त्यांतून सरकारी मालमत्ता सांठविलेली असते, आणि तिच्या रक्षणाकरिता कांहीं हजार दोन हजार तरी शिपाई ठेवलेले असतात. इतकें असून आबाजीनें कल्याणचा सुभा हें हें म्हणतां सर केला याचा अर्थ काय? अर्थ इतकाच कीं, किल्ल्यांतून व ठाण्यांतून लोक होते त्यातले पुष्कळ शहाजीच्या नेमणुकीचे पूर्वीचेच होते।

शिवाजीनें राज्य चालवितांना पूर्वीचा शंभर वर्षांचा इतिहास डोळ्यापुढें ठेविलेला होता. पूर्वीच्या मुत्सद्यांचीं कारस्थानें व तीं सिद्ध करण्याच्या त्यांच्या शैली, पूर्वीच्या सेनापतींचीं युद्धें व त्यांतले त्यांचे डावपेंच, ज्यांच्याशीं त्याला झगडावें लागत असे ते विजापूरकर व मोंगल यांच्या सामर्थ्याविषयीं वेळोवेळ सिद्ध झालेलीं अनुमानें, या सर्व गोष्टींची त्यानें उत्तम प्रकारें माहिती करून घेतली होती.

शहाजीच्या व शिवाजीच्या कारकीर्दींची तुलना करितां येत नाहीं. त्या एकमेकांशीं विसदृश आहेत. शहाजीची कारकीर्द तीन वर्षांची, तर शिवाजीची चौतीस वर्षांची. शहाजीला सर्व गोष्टी एकदम घाईनें करावयाच्या होत्या, तर शिवाजीला विचार करून आपलें सामर्थ्य अजमावून आस्ते आस्ते पाऊल टाकण्यास अवकाश होता. तथापि आपल्या पराक्रमी पित्याच्या कारभारापासून जो धडा घ्यावयाचा तो शिवाजीनें घेतलाच नाशिकपासून चांदवडपर्यंतचे खानदेशांतले अनकाई, कनकाई, औंध, पट्टा, साल्हेर, मुल्हेर, धोडप वगैरे निजामशाही २७ किल्ले शहाजीनें एक महिन्यांत सर केले. पण तेच किल्ले शाइस्तेखानानें तितक्याच वेळात पुन्हा सर केले! असें होण्याचें कारण एवढेंच कीं, आपण बसविलेल्या नवीन सुलतानाची द्वाही किल्ल्यावर फिरली, आपले दहापांच शिपाई व निशाण गडकऱ्यानीं किल्ल्यावर घेतलें, कीं किल्ला सर झाला! तसें करण्यात म्हणजे शहाजीचा दोष होता असें नाहीं. त्याचें राज्य टिकलें असतें तर हे सर्व किल्ले त्याचेच होते. पण तसें तें टिकलें नाहीं. तेव्हा त्याच्याच पद्धतीनें मोंगलानीं ते किल्ले घेऊन पुढें स्वस्थपणानें तेथचा अंमल कायम केला. पुढें शिवाजीनें तेच किल्ले पुन्हां मोंगलांपासून घेतले तेव्हां मागचें वैगुण्य ठेविलें नाहीं; तर परचक्र आलें असतां ते किल्ले वर्षसहा महिने झुजवितां येतील असा बंदोबस्त केला! शहाजीनें वर्ष दोन वर्षांत एक कोट रुपये उत्पन्नाच्या मुलखावर अंमल बसविला खरा, पण खरें पाहिलें असता तेथें त्याचा खरोखरीचा अंमल बसला नसून अंमलाची फक्त सावलीपडली होती! कारण, जितक्या सौलभ्यानें त्यानें प्रांत काबीज केले तितक्याच सौलभ्यानें मोंगलांनीं ते त्याजकडून हिसकून घेतले! ज्याचा शत्रूपासून बचाव करिता

९५६४



येणार नाहीं असा मोकळ्या मैदानाचा मुलूख शिवाजीनें आपल्या राज्यात कधींच समाविष्ट केला नाहीं. मात्र दर वर्षास स्वारी करून त्या मुलखांतून खंडणी वसूल करण्याचा त्याचा शिरस्ता होता.

शहाजीजवळ तोफा व पायदळ नव्हतें. यामुळें अहमदनगरसारखीं शहरें त्याला लढून घेतां येण्याजोगीं नव्हतीं शिवाजीनें ती उणीव काढून पायदळाचा व तोफांचा मुबलक सरंजाम सज्ज केला व त्याचा उपयोगही मोठमोठे किल्ले लढून घेण्यात त्यास करिता आला शहाजीजवळ मोठें सैन्य नव्हतें यामुळें मोंगल सुभेदारास समोरासमोर गांठून लढाई देण्यास तो असमर्थ होता. शत्रूच्या लुंग्यासुंग्या टोळीला अथवा बरोबरीच्या फौजेला तो भारी होता, पण मोंगल त्यावर फौज पाठवीत ती नेहमीं दुप्पट तिप्पट मोठी असल्यानें त्यास चुकांडया देऊन आपला बचाव करून घ्यावा लागे. तथापि शत्रूचा मुलूख लुटून जाळून त्याचें अतोनात नुकसान करणें हें गनिमी लढाईचें प्रधान अंग त्याला पूर्ण अवगत होतें व त्याचाच आश्रय करून त्यानें आपल्या चिमुकल्या सैन्याच्या बळावर तीन वर्षेपर्यंत मोंगलांस हैराण केलें, ही गोष्ट शिवाजीच्या लक्ष्यांतून जाण्याजोगी नव्हती. त्यानें आपलें घोडदळ बापापेक्षा चारपांच पटीनें वाढवून मोंगलाई राज्यावर गनिमी लढाईचा चांगलाच दरारा बसविला । महाराष्ट्राच्या इतिहासांत शहाजीची मुख्य कामगिरी ही आहे कीं, स्वतंत्र व निवळ मराठी फौज लहान असली तरी तिला मोंगलांपुढें टिकाव धरता येतो हें त्यानें कृतीनें सिद्ध करून दाखविलें व मोंगलाच्या अमोघ सामर्थ्याचा बागुलबोवा जमिनींत कायमचा गाडून टाकला ! आणि त्याच्या या कृत्यापासूनच पुढें स्वतंत्र मराठी राज्याची कल्पना आविर्भूत झाली ।

मलिकंबर व शिवाजी यांचें परराष्ट्राशीं वागण्याचें धोरण हुबेहूब एकच होतें. आपली सत्ता कायम राखण्याकरितां विजापुरकर व मोंगल याशीं झगडण्यात दोघांचा जन्म गेला दोघेहि तशीच वेळ येऊन बेतली तर मोंगलास मी तुझा ताबेदार होतों, तुला खंडणी देतों, असें बोलून तेवढी वेळ मरून नेत आणि साधेल तेव्हां त्याच्या उरावर बसून मागचा वचपा भरून काढीत! एका शत्रूशीं लढताना दुसऱ्या शत्रूशीं सरळ राहण्याची खबरदारी दोघेही घेत पण प्रसंगीं मोंगल व विजापुरवाले एक झाले तर त्यांशीं बेजरब झूंज घ्यायला दोघेहि कचरत नसत ।

शिवाजी स्वतःस निजामशाही राज्याचा वारस समजत होता. तें राज्य माझ्या बापापासून चोरांनीं लबाडीनें व जबरदस्तीनें काढून घेतलें आहे तें त्यांना ठोक देऊन परत हिसकून घेण्यांत काहीं एक पाप नाहीं असें तो समजत असे हा त्याचा समज चुकीचा अगर अन्यायाचा होता असें नाहीं. पण मोंगल इतिहासकारांनीं शिवाजीला बंडखोर ठरविलें ! मागून इंग्रजी इतिहासकार आले त्यानींही शिवाजीला बंडखोर ठरवून आम्हांला तसेंच घोकायला लावलें ! शिवाजी बंडखोर होता या कल्पनेचा स्वैरसंचार इतका अप्रतिबद्ध झाला आहे कीं, एकदा ती न्यायाच्या कोर्टांतसुद्धा शिरली होती !

**समाप्त.**

RLLBK-0001764